# ‘लाडक्या बहिणीं’च्या खात्यात आजपासून येणार निधी



**मुंबई :** महाराष्ट्र सरकारच्या महिला व बाल विकास विभागाकडून राबवल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा ऑक्टोबर महिन्याचा निधी मंगळवार (दि.४) पासून मिळणार आहे. लवकरच योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात सन्मान निधी वितरित होणार आहे. ऑक्टोबर महिन्याचे १५०० रुपये कधी मिळणार याकडे सर्व पात्र महिलांचे लागले होते. त्यांना दिलासा मिळाला आहे. महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी ऑक्टोबर महिन्याचा हप्ता जारी करण्यासंदर्भात माहिती दिली. त्यांनी एक्स या प्लॅटफॉर्मवर केलेल्या पोस्टमध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महिला सक्षमीकरणाची अखंड क्रांती असल्याचे म्हटलेय. त्याचवेळी पात्र महिलांनी या योजनेची केवायसी १८ नोव्हेंबरच्या आधी पूर्ण करून घेण्याचे आवाहनही केले आहे.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १०७
www.ramprahar.com
◆ मंगळवार, ४ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


अलिबाग-रोहा मार्गावरील वढाव येथील पूल कोसळला/२

पोलादपूर नगरपंचायतीकडून पुन्हा मालमत्ता करवाढ नोटीस/५

शांत, संयमी अमोल मुजुमदार पडद्यामागचा हिरो/८


# शिवरायांच्या पवित्र स्मृतीस लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिवादन


## ऐतिहासिक रायगडाचा दौरा; राजमाता जिजाऊंच्या समाधीस्थळीही नतमस्तक

**महाड : रामप्रहर वृत्त**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक तथा महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र स्मृतीस माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोमवारी (दि. ३) ऐतिहासिक रायगडावर जाऊन विनम्र अभिवादन केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने आणि दूरदर्शी नेतृत्वाने स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाला अभिवादन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महाराष्ट्रातील युवकांनी शिवचरित्रातून प्रेरणा घ्यावी, असा संदेश दिला. या वेळी त्यांनी महाराजांच्या समाधीस पुष्प अर्पण करून नतमस्तक होत अभिवादन केले. तत्पूर्वी पाचाड येथे राजमाता जिजाऊंच्या स्मृतींना अभिवादन केले.

या वेळी त्यांच्यासमवेत भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, बिपीन म्हामुणकर, (पान २ वर..)





(अधिक छायाचित्रे पान ३ वर)

# केंद्रीय पथक महाराष्ट्रात दाखल

## आजपासून करणार नुकसानग्रस्त भागांची पाहणी

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील पूर आणि अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक सोमवारी (दि. ३) मुंबईत दाखल झाले. हे पथक मंगळवार आणि बुधवारी विविध नुकसानग्रस्त भागांना भेटी देऊन आढावा घेणार आहे.

केंद्रीय गृहमंत्रालयाचे सहसचिव आर. के. पांडेय यांच्या नेतृत्वातील या पथकात आठ जणांचा समावेश आहे. पथकात पांडे यांच्या व्यतिरिक्त पथकात कंदर्प व्ही. पटेल (उपसचिव, व्यय विभाग, वित्त मंत्रालय), सत्येंद्र प्रताप सिंग (संचालक, जलशक्ती मंत्रालय, सीडब्ल्यूसी पुणे), विशाल पांडे (कार्यकारी अभियंता, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, मुंबई), अभिषेक कुमार (अवर सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय), करण सरीन (उपसंचालक, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, ऊर्जा मंत्रालय) आणि डॉ. एसव्हीएसपी शर्मा (वैज्ञानिक-एसएफ, राष्ट्रीय सुदूर संवेदन केंद्र, इस्रो, हैदराबाद) असे विविध केंद्रीय मंत्रालये आणि विभागांचे प्रतिनिधी आहेत.



या वर्षी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला. याचा सर्वाधिक फटका मराठवाड्याला बसला आहे. धाराशिव, बीड आणि जालना यांसारख्या जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा १३०% ते १५०% अधिक पाऊस झाला. त्यामुळे पिकांचे नुकसान झाले तसेच सखल भागात पाणी साचून जीवित व वित्तहानी झाली.

राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य सरकारने ३१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले असले तरी त्याची काही रक्कम केंद्र सरकारकडून मिळणार आहे. अशी मदत मिळावी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. आता मदतीपूर्वी राज्य सरकारकडे जिल्हा प्रशासनाने कळविले असले तरी त्याचे स्वरूप समजून घेण्यासाठी अधिकाऱ्याचे हे पथक येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

केंद्रीय पथक पुढील दोन दिवस विविध नुकसानग्रस्त भागांना भेटी देईल. या पाहणी दौऱ्यानंतर एक सविस्तर अहवाल केंद्र सरकारला सादर केला जाईल, ज्याच्या आधारावर पूरग्रस्तांसाठी मदतीची घोषणा केली जाण्याची शक्यता आहे.

या भेटीचा मुख्य उद्देश नुकसानीची व्याप्ती तपासणे आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी व राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत आर्थिक मदतीसाठी शिफारसी करणे हा आहे. पाहणी दौऱ्यात प्रामुख्याने मराठवाड्यातील नुकसानग्रस्त भागावर लक्ष केंद्रित करणार असून इतरही विभागांचा आढावा घेतला जाणार आहे.

## जैन मुनींचे उपोषण मागे

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या आझाद मैदानात जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी दादर कबुतरखानासह इतर कबुतरखाने पुन्हा सुरू करण्याच्या मागणीसाठी आमरण उपोषण सुरू केले होते, परंतु शासनाच्या आश्वासनानंतर जैन मुनींनी आमरण उपोषण मागे घेतले आहे.

जोपर्यंत शासन त्यांच्या मागण्या मान्य करत नाही, तोवर अन्न आणि पाण्याचा त्याग करण्याचा निर्धार जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी केला होता. या पार्श्वभूमीवर मंत्री मंगल प्रभात लोढा आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी त्यांची भेट घेतली. चर्चेनंतर सरकारतर्फे १५ दिवसांची मुदत देण्यात आली असून या कालावधीत तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

## म्हसळ्यातील वृद्ध दाम्पत्याची हत्या घरगुती वादातून झाल्याचे उघड

### स्वतःच्याच दोन मुलांचे कृत्य; पोलिसांकडून अटक

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यातील मेंदडीकोंड गावात रविवारी (दि. २) वृद्ध दाम्पत्याचे मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली होती. पोलिसांनी केवळ १२ तासांत गुन्ह्याचा छडा लावत आरोपींना अटक केली आहे. धक्कादायक म्हणजे दोन मुलांनीच आपल्या आई-वडिलांची हत्या केल्याचे विदारक वास्तव समोर आले आहे.

नरेश महादेव कांबळे (वय ६२, मजूर) आणि चंद्रकांत महादेव कांबळे (वय ६०, निवृत्त कर्मचारी) अशी आरोपींची नावे आहे. आई-वडिलांच्या मृत्यूबाबत त्यांची मुलगी आणि आरोपींची बहीण अर्चना भालचंद्र पाटील हिने फिर्याद दिली होती. त्यानुसार पोलिसांनी तपासचक्र फिरवत आरोपींना बेड्या ठोकल्या.

आरोपींनी घरखर्च व घरात राहण्यास देण्याच्या वादावरून वडील महादेव कांबळे (वय ९५) आणि विठाबाई कांबळे (वय ८३) यांचा गळा घोटून खून केल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना गजाआड केले आहे.



चंद्रकांत कांबळे



नरेश कांबळे

जिल्हा पोलीस अधीक्षक अचल दलाल, उपविभागीय पोलीस अधिकारी अभिजीत शिवतारे, शंकर काळे, पुष्कराज सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक रवींद्र पारखे व उपनिरीक्षक सुनील कोहीणकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली. या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

दरम्यान, आरोपींना सोमवारी न्यायालयात हजर केले असता ७ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## निवडक

### उद्योजक अनिल अंबानी यांच्यावर ‘ईडी’ची कारवाई



**मुंबई :** उद्योजक अनिल अंबानी यांच्या रिलायन्स समूहाशी संबधित तीन हजार कोटी रुपयांच्या चाळीसहून अधिक मालमत्ता सक्तवसुली संचलनालयाने जप्त केल्या आहेत. दिल्ली, नोएडा, गाजियाबाद, मुंबई, पुणे, ठाणे, हैदराबाद, चेन्नई, कांचीपुरम आणि पूर्व गोदावरी इथं या मालमत्ता आहेत. अंबानी यांच्यावरील कर्ज घोटाळा आणि मनी लॉण्डरिंगप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

### आक्षेपार्ह वक्तव्यामुळे असीम सरोदेंची सनद रद्द

**नागपूर :** प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. असीम सरोदे यांची वकिलीची सनद तीन महिन्यांसाठी रद्द करण्यात आली आहे. महाराष्ट्र आणि गोवा बार काऊन्सिलने दिलेल्या निर्देशानुसार ॲड. विवेकानंद घाटगे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ही कारवाई केली आहे. सरोदे यांनी एका सार्वजनिक कार्यक्रमात न्यायव्यवस्था, राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्ष यांच्यासंदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केले होते.

## भारत तंत्रज्ञानाचा केवळ ग्राहक नसून प्रगतीचा प्रणेता

### पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आता तंत्रज्ञानाचा केवळ ग्राहक नाही, तर तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा प्रणेता बनला आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. नवी दिल्लीमध्ये सोमवारी (दि. ३) उदयोन्मुख विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेष परिषद २०२५चे उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते.

या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी देशातील संशोधन आणि विकास परिसंस्थेला चालना देण्यासाठी एक लाख कोटी रुपये अर्थसहाय्य देणाऱ्या संशोधन, विकास आणि नवोन्मेष योजनेचाही प्रारंभ केला. खासगी क्षेत्राकडून संचलित केल्या जाणाऱ्या संशोधन आणि विकास परिसंस्थेला प्रोत्साहन देणे हे या योजनेचे उद्दिष्ट असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले.

शिक्षणतज्ज्ञ, संशोधन संस्था, उद्योग आणि सरकारमधल्या तीन हजारांपेक्षा जास्त सहभागींना एकत्र आणणे हा या तीन दिवसीय परिषदेचा हेतू आहे. यामध्ये भाषणे, पॅनेल चर्चा, सादरीकरण आणि तंत्रज्ञानविषयक प्रदर्शने आयोजित केली जातील. देशाची विज्ञान आणि तंत्रज्ञान परिसंस्था मजबूत करण्यासाठी संशोधक, उद्योग आणि तरुण नवोन्मेषकांमधल्या सहकार्यासाठी हे योग्य व्यासपीठ ठरेल.

देशात नवोन्मेषाची परिसंस्था निर्माण व्हावी यासाठी सरकार प्रयत्न करत असून जगातील सर्वात यशस्वी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा भारतात असल्याचे पंतप्रधान मोदींनी या वेळी नमूद केले.

## ट्रक बसवर आदळून १९ जण मृत्युमुखी

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

तेलंगणातील रंगारेड्डी जिल्ह्यात मिरजागुडा येथे सोमवारी (दि. ३) खडी घेऊन जाणारा ट्रक प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसला धडकून १९ जणांचा मृत्यू झाला आहे. या भीषण अपघातात २० जण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

टीजीएसआरटीसी बस तंदूर येथून हैदराबादकडे निघाली होती, मात्र चेवेल्लाजवळील मिरजागुडा येथे समोरून येणारा ट्रक बसवर आदळला. या अपघातात ट्रकचालक, बसचालकासह इतर प्रवासी मृत्यमुखी पडले. जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

याआधी राजस्थानमधील फलोदी जिल्ह्यातील मतोडा परिसरात रविवारी (दि. २) संध्याकाळी उशिरा झालेल्या रस्ते अपघातात १५ जणांचा मृत्यू झाला होता, तर काही जण जखमी आहेत. जोधपूरमधून यात्रेकरूंना घेऊन निघालेली बस भारतमाला एक्सप्रेस वेवर थांबलेल्या ट्रकला धडकल्याने हा अपघात झाला.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दोन्ही घटनांबद्दल शोक व्यक्त केला आहे तसेच मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

## भरधाव डंपर काळ बनून धावला!

### अनेकांना चिरडले, वाहनांना धडक, १४ जणांचा मृत्यू



**जयपूर : वृत्तसंस्था**

जयपूरमध्ये एका मद्यधुंद डंपरचालकाने केलेल्या भीषण अपघातात १४ जणांचा मृत्यू झाला असून ४० जण जखमी झाले आहेत. हरमाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोहामंडी रस्त्यावर या चालकाने रस्त्यावरील माणसे, वाहनांना चिरडले. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता असून परिसरात संतापाचे वातावरण आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार डंपरचालक मद्यधुंद अवस्थेत होता. त्याने समोर येणाऱ्या अनेक वाहनांना धडक दिली. सुरुवातीला डंपरने एका कारला धडक दिली, मात्र त्यानंतर डंपर थांबला नाही. त्याने आणखी चार वाहनांना धडक दिली. या सगळ्यात १४ जणांनी जागीच जीव गमावला, तर ४० जण जखमी झाले. डंपरने चिरडलेल्या वाहनांखाली अनेक जण दबले गेले. जवळपास पाच किलोमीटर अंतर डंपरने कापले. डंपरचा हा प्रवास अनेकांच्या जीवावर बेतला असून त्यांच्या कुटुंबांवर शोककळा पसरली आहे.

## विश्वविजेत्या भारतीय संघावर अभिनंदनाचा वर्षाव!



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत प्रथमच विश्वविजेतेपदावर आपले नाव कोरले. भारतीय महिला क्रिकेट संघाच्या या ऐतिहासिक कामगिरीनंतर सर्व स्तरांतून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

भारतीय महिला संघाने नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर झालेली फायनल जिंकत इतिहास रचला. टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करताना ७ बाद २९८ धावा केल्या होत्या. त्यानंतर द. आफ्रिकेला २४६ धावांमध्ये गारद करून ५२ धावांनी विजय साकारला. या ऐतिहासिक विजयानंतर भारतात पुन्हा एकदा दिवाळी साजरी झाली. फटाके वाजवून या यशाचा आनंद ठिकठिकाणी साजरा करण्यात आला.

महिला क्रिकेट संघाची ही महत्त्वपूर्ण लढत पाहण्यासाठी मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर, हिटमॅन रोहित शर्मा, माजी क्रिकेटपटू अंजुम चोप्रा, मिताली राज, झूलन गोस्वामी यांच्यासारखे दिग्गज खेळाडू आवर्जून स्टेडियममध्ये उपस्थित होते. त्यांनी आधी खेळाडूंना प्रोत्साहन, पाठिंबा दिला आणि विजयानंतर कौतुक, अभिनंदन केले. याशिवाय इतर खेळाडू तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर ते सर्वसामान्यांकडून प्रत्यक्ष तसेच सोशल मीडियातून शुभेच्छांचा वर्षाव सुरू आहे.

## पावसाने बिघडवली साऱ्यांचीच समीकरणे

**माणगाव : प्रतिनिधी**

सप्टेंबरमध्ये मान्सूनचा कालावधी संपल्यानंतर प्रखर ऊन, उकाडा आणि ऑक्टोबर हिटची चर्चा नेहमीच होते. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात तापमानाचा पारा ३८ अंशावर गेला होता. यंदा परिस्थिती पूर्णपणे उलट दिसत आहे. राज्यात यंदा महिनाभर ढगाळ वातावरण आणि दररोज पडणाऱ्या पावसामुळे ऑक्टोबर हिट पूर्णपणे गायब झाली, तर नोव्हेंबरच्या सुरुवातीलादेखील काही ठिकाणी पाऊस पडला आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार मागील काही वर्षांच्या तुलनेत यंदा ऑक्टोबर महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली. अनेक भागात अजूनही या पावसाचे सत्र सुरू आहे. सध्या दिवसाढवळ्या ऊन पडत असले तरी काही तासांतच काळे ढग दाटून येतात आणि पाऊस बरसतो. त्यामुळे उष्णतेऐवजी वातावरणात गारवा आणि दमटपणा वाढला आहे.

साधारणपणे सप्टेंबरअखेर पावसाचे प्रमाण घटते आणि ऑक्टोबरमध्ये तापमान वाढून उष्णता जाणवते, पण यंदा पावसाने संपूर्ण ऑक्टोबर महिन्यात हजेरी लावल्याने दिवसाचाही तापमानाचा पारा ३० अंशांच्या आसपासच राहिला आहे.



दरम्यान, सततच्या पावसामुळे खरिपातील काढणीस आलेल्या पिकांचे नुकसान झाले आहे, तर रब्बी हंगामातील लागवड लांबणीवर गेली आहे. वास्तविक ऑक्टोबर महिन्यातील तीव्र उन्हाळ्यामुळे जमीन कोरडी होऊन पुढील हंगामाच्या तयारीसाठी शेतकऱ्यांना पुरेसा वेळ मिळत असतो, मात्र यंदा पाऊस लांबल्याने बळीराजाचेही समीकरण बिघडून गेल्याचे चित्र आहे. आता पुढे काय होतेय याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ज्येष्ठ अभिनेत्री दया डोंगरे यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी नाट्यसृष्टी आणि चित्रपटसृष्टी गाजविणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री दया डोंगरे यांचे निधन झाले आहे. वयाच्या ८५ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

दया डोंगरे यांना कलेचा वारसा त्यांना घरातूनच लाभला. त्यांच्या आई यमुताई मोडक यादेखील अभिनेत्री होत्या, तर आत्या शांता मोडक गायिका आणि अभिनेत्री होत्या. कारकिर्दीच्या सुरुवातीला त्यांचा कल संगीताकडे होता. आकाशवाणीच्या गायन स्पर्धेत त्यांनी नाव कमावले होते, परंतु अभिनयाकडे त्यांनी मोर्चा वळवला आणि त्यामध्ये त्या प्रचंड यशस्वी ठरल्या. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

# मत्स्यसंपदा योजना २६ जानेवारी २०२६ रोजी लागू करण्याचे उद्दिष्ट

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री मत्स्य संपदा योजना २६ जानेवारी २०२६ रोजी लागू करण्याचे उद्दिष्ट आहे. त्या अनुषंगाने विभागाने समन्वयाने काम करून या योजनेचा आराखडा तातडीने तयार करावा, अशा सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिल्या.

मंत्रालयात या योजनेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मत्स्यवसाय विभागाचे सचिव एन. रामास्वामी, मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे, आणि मत्स्य उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश पाठक यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, ही योजना राज्यातील मच्छीमार समुदायाच्या आर्थिक उन्नतीसाठी आणि मत्स्यव्यवसायाचे आधुनिकीकरण करण्यासाठी मैलाचा दगड ठरेल. या योजनेचा उद्देश राज्यातील मत्स्यव्यवसायाला संरचनात्मक बळ देणे, मच्छीमारांचे उत्पन्न वाढविणे, तसेच सागरी अर्थव्यवस्थेला गती देणे हा आहे.



या योजनेसाठी २६ जानेवारी २०२६ (प्रजासत्ताक दिन) रोजी अंमलबजावणी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यासाठी राज्य व जिल्हा स्तरावर सविस्तर कृती आराखडा तयार करावा. या योजनेच्या आराखड्यास मंजुरीसाठी वित्त व नियोजन विभागासोबत संयुक्त बैठक घेऊन निधी, अंमलबजावणीची यंत्रणा, आणि लाभार्थी निवड प्रक्रिया अंतिम करण्याचे आदेशही मंत्री राणे यांनी दिले.

या योजनेत मत्स्य बंदरे, थंडसाखळी सुविधा, बर्फगृहे, मत्स्य प्रक्रिया केंद्रे, तसेच नवीन मत्स्य उत्पादन व विपणन उपक्रमांना आर्थिक साहाय्य दिले जाणार आहे. बैठकीत वनक्षेत्रातील तलावांमध्ये मासेमारीस कायदेशीर परवानगी देण्याबाबतही चर्चा झाली. सध्या काही ठिकाणी होणारी मासेमारी अनधिकृत असल्याने, त्याला कायदेशीर स्वरूप देऊन रोजगारनिर्मिती व उत्पन्नवाढीस चालना देण्याचा प्रस्ताव वन विभागाकडे पाठविण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. वन अधिवासाला कोणताही धोका निर्माण न होता ही प्रक्रिया राबविण्याचा विश्वास मंत्री राणे यांनी व्यक्त केला.

राष्ट्रीय सागरी मत्स्यव्यवसाय जनगणना २०२५चा शुभारंभ

भारतातील सागरी मत्स्यव्यवसाय क्षेत्र अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सागरी मत्स्यव्यवसाय जनगणना २०२५ ला आज औपचारिक सुरुवात झाली. मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते मंत्रालय मुंबई येथे या जनगणनेचा शुभारंभ करण्यात आला. देशातील ही पाचवी सागरी मत्स्य जनगणना असून ती ३ नोव्हेंबर ते १८ डिसेंबर २०२५ दरम्यान पार पडणार आहे. केंद्रीय सागरी मात्स्यिकी संशोधन संस्थाआणि मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम राबविली जात आहे.

जनगणनेची उद्दिष्टे व वैशिष्ट्ये

या मोहिमेचा उद्देश केवळ आकडेवारी गोळा करणे नसून देशातील सुमारे १२ लाख मत्स्यव्यवसायिक कुटुंबांची माहिती, ५६८ मासेमारी गावे आणि १७३ मत्स्य उतरण केंद्रे यांचा तपशीलवार अभ्यास करून सागरी क्षेत्रातील धोरणनिर्मिती व नियोजनाला दिशा देणे आहे. या अंतर्गत मच्छीमारांची सामाजिक-आर्थिक स्थिती, पायाभूत सुविधा, उपजीविका साधने आणि शासकीय योजनांच्या लाभांबाबतची माहिती संकलित केली जाणार आहे.

# कर्जतमध्ये बैलाची चोरी
## पोलिसांनी मागितला जन्माचा दाखला

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात बैल चोरीची तक्रार दाखला करण्यास गेलेल्या शेतकर्याला पोलिसांनीच विचारले - बैलाचा जन्म दाखला आहे का? अशा अजब प्रश्नाने शेतकऱ्यानी संताप व्यक्त केला आहे


अंजप गावातील तानाजी माळी या शेतकऱ्याचा बैल रविवारी पहाटे चोरट्यांनी घराच्या अंगणातूनच पळवून नेला. सीसीटीव्ही फुटेजमध्ये गो-तस्करांनी पावाचे तुकडे टाकून बैलाला फसवताना आणि हाताने धरून आलिशान वाहनात बसवताना स्पष्ट दिसत आहेत . तिन-चार तरुणांचा हा टोळका सर्रास गावात घुसून शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह असलेले जनावरच उचलतोय



तानाजी माळी सकाळी उठल्यावर बैल चोरीला गेल्याचे लक्षात आले. त्यांनी तत्काळ कशेळे पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी धाव घेतली. मात्र तेथे पोलिसांनी सरळ विचारले, चोरीला गेलेल्या बैलाचा जन्म दाखला आणा! या प्रतिसादाने शेतकरी अक्षरशः कोसळला. न्याय मागायला गेल्यावरच प्रशासनाचा उपहास अनुभवावा लागला, यामुळे शेतकऱ्याने आपल्याच तोंडात मारून घेतली अशी अवस्था झाली आहे.

एकीकडे परतीच्या पावसाने हातातोंडाशी आलेले पीक वाहून गेले, भात पिकं पाण्यात बुडाली, शेतकऱ्यांचा संसार उद्ध्वस्त झाला. शासनाने अद्याप ओला दुष्काळ जाहीर केलेला नाही. त्यातच गो-तस्करांचा थैमान सुरू झाले आहे. काही दिवसांपूर्वी नेरळ-कोदीवले परिसरात तस्करांनी शेतकऱ्याचे बैल कापून त्याचे मांस विक्रीसाठी नेल्याचे प्रकरण उघड झाले होते. आणि आता पुन्हा अंजपमध्ये ही घटना घडली आहे.

या प्रकारांमुळे प्रशासनाच्या निष्काळजीपणावर आणि पोलिसांच्या अजब कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून, शेतकरी संघटनांनी याविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे.





**पेण : भाजपचे दक्षिण रायगड महामंत्री वैकुंठ पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना खासदार धैर्यशील पाटील, माजी आमदार अनिकेत तटकरे, उद्योजक राजू पिचिका आदी पदाधिकारी आणि कुटुंबातील सदस्य.**

# अलिबाग-रोहा मार्गावर वढाव येथील पूल कोसळला
## सुदैवाने मोठी जीवितहानी टळली

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-रोहा मार्गावरील खानाव-वढाव परिसरात पुलाचा एक मोठा भाग सोमवारी (दि. ३) सायंकाळी कोसळला. या दुर्घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे समजते.

पुलावरून काही वाहने जात असताना अचानक काँक्रीटचा भाग खचला आणि पुलाचा मधला भाग कोसळला. यावेळी एक दुचाकी पुलावरून जात होती. दुचाकी वरील एक प्रवासी किरकोळ जखमी झाला. अपघात घडताच नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत, वाहतुकीसाठी दोन्ही बाजू बंद केल्या.

घटनेची माहिती मिळताच पोलीस व स्थानिक प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, नागरिकांनी प्रशासनाच्या दुर्लक्षावर



नाराजी व्यक्त केली आहे. हा पूल गेल्या काही महिन्यांपासून खराब स्थितीत होता आणि त्याची दुरुस्ती वारंवार मागणी करूनही करण्यात आली नव्हती, असे स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सध्या या रस्त्यावरुन जाणारी घटनास्थळीची वाहतूक वळविण्यात आली असून, संबंधित विभागाकडून तातडीने तपासणी व दुरुस्तीचे काम सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

# महाड ढालकाठी येथे तरुणाची आत्महत्या

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्याच्या हद्दीत ढालकाठी या ठिकाणी राहणाऱ्या एका तरुणांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली असून या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

याप्रकरणी महाड औद्योगिक वसाहत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार राजेश विठ्ठल सकपाळ वय वर्ष ४५ मूळ राहणार शेल बौद्धवाडी तालुका महाड हा नोकरी व्यवसाय निमित्त ढालकाठी तालुका महाड या ठिकाणी रहात होता. या राहत्या घरात त्याने २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६:०० वाजता गळफास घेऊन आत्महत्या केली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक जे एच माने यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी करून मृतदेह सविच्छेदनासाठी पाठवून कारणाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

# ढाक डोंगरावरून आणला डोलकाठीचा गरूडध्वज

**कर्जत : प्रतिनिधी**

देऊळवाडी किरवली येथील कार्तिक पौर्णिमेच्या उत्सवासाठी परंपरेनुसार डोलकाठीच्या टोकाला बांधण्यासाठी ढाक डोंगरावरील चढण्या - उतरण्यास अत्यंत कठीण असलेल्या भैरी मंदिरातून गरुड ध्वज आणला. यावेळी ढाक डोंगरावर गेलेल्यांमध्ये युवकांचा सहभाग होता. पाऊस असूनही या युवकांचा उत्साह कायम होता.

सकाळी गरुड ध्वजाची पूजा राजेश नेताजी बडेकर यांच्या हस्ते देऊळवाडी येथील मंदिरात करण्यात आली. त्यानंतर श्री ग्रामदेवी बहिरी



तळई संस्थान, देऊळवाडी किरवली चे सचिव दिलीप बडेकर, पोलीस पाटील विवेक बडेकर, ज्ञानेश्वर जाधव, अनिल खंडागले, बिपिन बडेकर, अरविंद बडेकर, सनी गायकर, किरण गायकवाड, निखिल बडेकर, सोहम बडेकर, नयन बडेकर, नितीन बडेकर, सुरेंद्र रसाळ, प्रकाश बडेकर, सुनील अहिर, प्रशांत दिसले, केतन बडेकर, श्यामा बडेकर, जय बडेकर, बाळा बडेकर, शुभम बडेकर, अंकित गायकर, राज बडेकर, प्रतीक बडेकर आदी ग्रामस्थ गरुड ध्वज आणण्या साठी ढाक डोंगरावर गेले होते. तो गरुडध्वज ढाक भैरी मंदिरात आणल्या नंतर गरुड ध्वजाची पूजा पोलीस पाटील विवेक बडेकर यांच्या हस्ते करण्यात आली.

यानंतर दिलीप बडेकर यांच्या हस्ते करून अभिषेक करण्यात आला आणि देवतेला यात्रेला येण्याचे आवाहन केले. त्यानंतर हे सारे भाविक भक्त मार्गस्थ झाले. हा गरुड ध्वज देऊळ वाडी येथे आणण्यात आला.

# गुरू तेग बहादूर यांच्या ३५०व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त खारघर येथे भव्य कार्यक्रम

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

हिंद-की-चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५०व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त जिल्ह्यात दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी खारघर येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व हिंद-की-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती, शीख-सिकलीकर, बंजारा लमाण, मोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज आढावा बैठकीत दिले.

यावेळी उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) डॉ.रविंद्र शेळके, उपजिल्हाधिकारी (रोहयो) रविंद्र राठोड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.निशिकांत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी उमेश सूर्यवंशी यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी प्रत्यक्ष तर काही अधिकारी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. जिल्हाधिकारी किशन जावळे पुढे म्हणाले की, हिंद-की- चादर श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यात नांदेड, नागपूर व नवी मुंबई या तीन ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाकरिता क्षेत्रीय आयोजन समिती स्थापन करण्यात येत असून वेळोवेळी आढावा घेवून कालबद्ध कार्यक्रम निश्चित करणे, कार्यक्रमाच्या अनुषंगाने मार्गदर्शक समिती तसेच आयोजन व्यवस्थापन समित्या वेळोवेळी आढावा बैठक घेणे व त्याची माहिती सादर करावयाची आहे.

# दाखले दिल्याने आदिवासी बांधव आनंदित

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यामध्ये उंबरे व साजगाव येथील आदिम जमातीतील कातकरी समाजातील नागरिकांना आधार कार्ड नोंदणी करणे कामी कोणतेही कागदपत्र उपलब्ध नसल्यामुळे वय व अधिवास दाखल्याची आवश्यकता असल्याने कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नसताना स्थानिक चौकशीच्या आधारे तहसीलदार अभय चव्हाण यांनी दाखले उपलब्ध करून दिल्याने आदिवासी बांधव आनंदित झाले.

तहसीलदार अभय चव्हाण यांच्या मार्गदर्शनानुसाररोहन नथू वाघमारे व इतर एकूण १७ लाभार्थ्यांना वय व अधिवास दाखले वाटप करण्यात आले. यावेळी आदिवासी संघटनेचे कार्यकर्ते यांनी तहसीलदार खालापूर यांचे आभार व्यक्त केले.

पान १ वरुन

# शिवरायांच्या पवित्र स्मृतीस लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिवादन

पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, केदार भगत, रूपेश नागवेकर, प्रीतम म्हात्रे, प्रशांत मोरबाळे आदी उपस्थित होते. महाडकरांच्या वतीने म्हामुणकर व ग्रामस्थांनी लोकनेते रामशेठ ठाकूर आणि अन्य उपस्थितांचे स्वागत केले.

# टीईटी निर्णयाविरोधात शिक्षक आक्रमक
## सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याची मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

शिक्षक पात्रता परीक्षा टीईटी संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे राज्यातील प्राथमिक शिक्षकाचे भवितव्य अंधारात सापडल्याची भीती निर्माण झाली आहे या पार्श्वभूमीवर शिक्षकांना संरक्षण देण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करावी या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेने दिनांक ९ नोव्हेंबर रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर शिक्षकांचा मूक मोर्चा काढण्याचे आयोजन केले आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेच्या वतीने ४ ऑक्टोबर २०२५ रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मुक मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र त्यापूर्वीच १ऑक्टोबर रोजी राज्याचे शालेय शिक्षणराज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली व त्यावेळी त्यांनी टीईटी बाबत शासनाच्या वतीने पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यात येईल असे सर्व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना अवगत करण्यात आले होते

अनेक जिल्हा परिषदेच्या पदोन्नत्या थांबलेल्या आहेत. पदोन्नती होण्यासाठी टीईटी उत्तीर्ण होण्याची अट घालण्यात आलेली आहे. आश्रमशाळेतील शिक्षकाना टीईटी उत्तीर्ण न झाल्यास वेतन थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. टिईटी परीक्षा रद्द करा या प्रमुख मागणीसह शिक्षण सेवक पद्धत रद्द करण्यात यावी, १५ मार्च २०२४ चा संच मान्यता शासन आदेश रद्द करण्यात यावा, जुनी पेन्शन योजना लागू करा, सर्व ऑनलाईन कामे रद्द करा, राज्यातील सर्व विषय शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, वस्तीशाळा शिक्षकांची मूळ सेवा ही सेवासातत्यासाठी गृहीत धरण्यात यावी या प्रमुख मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेने मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. मोर्च्यात सहभागी होऊन मोर्चा यशस्वी करावा, असे आवाहन केले आहे

# गरीब वीज ग्राहकांना २५ वर्षे मोफत वीज योजनेसाठी महावितरणचा पुढाकार

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

दारिद्र्यरेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या घरांवर एक किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून त्यांना २५ वर्षे मोफत विजेची सुविधा उपलब्ध करण्यासाठीच्या स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (स्मार्ट) योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणने पुढाकार घेतला आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारच्या अनुदानामुळे या योजनेतील लाभार्थी ग्राहकांना खूप कमी हिस्सा भरावा लागणार आहे, असे महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य सरकारने स्मार्ट योजना सुरू केली आहे. दारिद्र्यरेषेखालील १.५४ लाख तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल ३.४५ लाख अशा महिना १०० युनिटपेक्षा कमी वीज वापणाऱ्या पाच लाख घरगुती वीज ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी ६५५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही योजना प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर राबविण्यात येणार आहे. महावितरणच्या नुकत्याच झालेल्या संचालक व मुख्य अभियंत्याच्या राज्यस्तरीय बैठकीत या योजनेच्या अंमलबजावणीबाबत सूचना देण्यात आल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे.ग्राहकांना एक किलोवॅटचा छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यासाठी ३० हजार रुपये अनुदान केंद्र सरकारकडून मिळते. स्मार्ट योजनेत या अनुदानाखेरीज राज्य सरकारकडूनही अनुदान मिळणार आहे स्मार्ट योजनेनुसार दारिद्र्यरेषेखालील ग्राहकांना एक किलोवॅटचा सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी केंद्राकडून ३० हजार रुपये तर राज्य कडून १७,५०० रुपये अनुदान मिळेल. सौर ऊर्जा प्रकल्पाची ऊर्वरित रक्कम भरून ग्राहक २५ वर्षे मोफत विजेचा लाभ घेऊ शकतो.

# मत्स्यव्यवसाय विभागातर्फे जनजागृती

## करंजा येथे कार्यक्रम; सुरक्षित यंत्रणा कार्यान्वित ठेवण्याचे आवाहन



**उरण : प्रतिनिधी**

मोंथा वादळात भरकटलेल्या मच्छीमार बोटी सुरक्षितरित्या विविध बंदरात दाखल झाल्यानंतर मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी मच्छीमारांमध्ये जनजागृती करण्यासाठी सोमवारी (दि.३) करंजा-उरण आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमातून मासेमारी करणाऱ्या सर्व खलाशी, तांडेल यांनी सुरक्षिततेसाठी ट्रान्सपॉट, व्हीटीएस, व्हीएचएन, वीमा आणि केंद्र,राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन मत्स्यव्यवसाय सह आयुक्त युवराज चौगुले यांनी केले.

यावेळी त्यांनी उपस्थितांना आवश्यक असलेल्या सर्व बाबींची खबरदारी घेण्याची शपथही दिली. सात दिवसांपुर्वी अरबी समुद्रात मोंथा वादळात राज्यातील अनेक मच्छीमार बोटी भरकटलेल्या होत्या. भरकटलेल्या मच्छीमार बोटी खलाश्यांसह सुखरूप विविध बंदरात दाखल झालेल्या आहेत, मात्र या वादळात भरकटलेल्या मच्छीमार बोटींशी संपर्क होऊ शकला नसल्याने मालक, तांडेल व खलाशी व त्यांच्या कुटुंबीयांयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. या दरम्यान खोल समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या अनेक मच्छीमार बोटीतील ट्रान्सपॉट, व्हीटीएस आदी यंत्रणा बंद करून ठेवण्यात आल्याचे आढळून आले होते. अथवा या यंत्रणांचा मच्छीमार वापर करण्याचे टाळत असल्याचे दिसून आले आहे. भरकटलेल्या मच्छीमार बोटींमध्ये संपर्कासाठी असलेल्या या यंत्रणा कार्यान्वित नसल्यानेच वादळात भरकटलेल्या मच्छीमार बोटींशी संपर्क साधणे शक्य होऊ शकले नव्हते.

यामुळे जाग आलेल्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या आयुक्तांनी खलाशी, तांडेल व मच्छीमारांसाठी तातडीने करंजा -उरण येथे जनजागृती कार्यक्रम आयोजित केला होता.

या कार्यक्रमावेळी व्यासपीठावर करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा, रायगड जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त संजय पाटील, परवाना अधिकारी सुरेश बागुलगावे,नांदोस्कर, अखिल महाराष्ट्र मच्छीमार, कष्टकरी खलाशी महासंघाचे अध्यक्ष विकास दाभोळकर, उपाध्यक्ष विष्णू नाटेकर, कोकणातील विविध मच्छीमार संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी, खलाशी, तांडेल, बोट मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खबरदारी घेण्याची शपथ

यापुढे बोट मालकांनी खोल समुद्रात मासेमारीसाठी जाणाऱ्या खलाशी, तांडेल यांच्या त्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षिततेसाठी विमा आणि आवश्यक त्या उपाययोजना केल्याखेरीज मासेमारीसाठी पाठवू नये असे आवाहन चौगले यांनी केले. तसेच केंद्र, राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहनही सह आयुक्त युवराज चौगुले यांनी केले. यासाठी त्यांनी उपस्थितांना सर्व बाबींची खबरदारी घेण्याची शपथही दिली.

# लोकशाही दिनी तक्रारींचे निवारण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये ३ नोव्हेंबर रोजी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गादर्शनाखाली 'लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले.

आजच्या बैठकित नागरी सेवा सुविधा विभाग व इतर असे चार अर्ज दाखल झाले होते, या अर्जाची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या. या कार्यक्रमास परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त मंगला माळवे, उपायुक्त नानासाहेब कामठे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, प्रभाग अधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे.



**पनवेल : भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू यांची कन्या वैष्णवी ही फ्लोरिडा येथील मायामी एव्हिएशन संस्थेत कमर्शियल पायलटची ट्रेनिंग पूर्ण करून कमर्शियल पायलट बनल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांनी अभिनंदन केले.**

# मोहोपाडा पंचशीलनगर येथे तरुणाची आत्महत्या

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा पंचशीलनगर येथील गजानन धोंडीराम पतंगे (वय ३६) या तरुणाने आपल्या राहत्या घरात



गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. त्याने घराच्या छताला असलेल्या लोखंडी पाईपला नायलॉनच्या दोरीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पतंगे याने नैराश्यातून टोकाचे पाऊल उचलले असावे, असे प्राथमिक चौकशीतून समोर आले आहे. या घटनेने पंचशील नगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# रस्त्यात कुत्रा आडवा आल्याने अपघात; दुचाकीस्वार ठार

**पनवेल : वार्ताहर**

रस्त्यात कुत्रा आडवा आल्याने त्याला वाचवण्यासाठी मोटरसायकलीचा ब्रेक दाबतात गाडी स्लिप होऊन झालेल्या अपघातात गाडीवरील चालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.




फिर्यादी मितेश ढवळे (वय २०, रा.डोंबिवली पूर्व) हा त्यांचा मावस भाऊ कुशल मनोज सोनकर (वय २०) व इतर पाच मित्र असे मोटारसायकलवरून लोणावळा येथे फिरायला जात असताना पनवेल जवळील जुन्या मुंबई-पुणे हायवे, पुणे लेनवर, बारवई गावाजवळ, येथे ते आले असता कुशल सोनकर याच्या ताब्यातील टाईम्फ स्पीड ४०० कंपनीची लाल-पांढऱ्या रंगाची मोटरसायकल (एमएन ०१ ईवाय १९१३) ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून रस्त्यात कुत्रा आडवा आला.

त्यास वाचविण्यासाठी त्याच्या मोटरसायकलचा ब्रेक जोरात दाबुन मोटारसायकल थांबविण्याचा प्रयत्न केला असता त्यांची मोटरसायकल जोराने स्लीप होवून तो रस्त्यावर पडून त्यास गंभीर दुखापत होवून मोटरसायकल नुकसान करून स्वतःचे मृत्यूस कारणीभूत ठरला आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# अरुण म्हात्रे यांचा पुरस्काराने सन्मान



**उरण : रामप्रहर वृत्त**

सम्राट अशोक साहित्य व सांस्कृतिक मंच लातूर, महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय कवी संमेलन, पुस्तक प्रकाशन व निवडक मान्यवरांचा पुरस्कार वितरण सोहळा लातूर येथे झाला. पुरस्कार सोहळ्यास संस्थेकडून राज्याच्या विविध भागांतील, विविध क्षेत्रातील गुणिजनांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. यामध्ये साहित्य, कला, सांस्कृतिक तसेच सामाजिक क्षेत्रात योगदान देणारे जासई-उरण-रायगडचे अरुण द. म्हात्रे यांची निवड काव्य व कलारत्न पुरस्कारासाठी करण्यात आली.

म्हात्रे यांना संस्थेचे अध्यक्ष, कार्यक्रमाध्यक्ष आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सम्राट अशोक काव्य व कलारत्न पुरस्कार-२०२५ने आदरपूर्वक गौरविण्यात आले.

# भुजबळवाडीत तुळशी विवाह



**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल सेक्टर १५र,भुजबळवाडी,येथे तुलसी विवाह निमित्त संपूर्ण भुजबळ कुटुंबीय आणि तेथील रहिवासी यांनी एकत्र येऊन सामुदायिक तुळशी विवाह केला. या वेळी मोठ्या संख्येने स्त्री-पुरुष, भुजबळ कुटुंबीय त्याचबरोबर बच्चेकंपनी हजर होते.

या वेळी माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, माजी उपनगराध्यक्ष सुभाष भुजबळ, तेजस भुजबळ, हेमंत भुजबळ, ॲड. अमित भुजबळ, ॲड. संकेत भुजबळ, ॲड. मधुरा भुजबळ, ॲड. प्रियांका भुजबळ, ॲड. अंजली भुजबळ, ॲड. प्रशांत भुजबळ, ॲड. सुरेखा भुजबळ, उद्योगपती शेखर भुजबळ, संतोष भुजबळ, उत्कर्ष सांस्कृतिक कला क्रीडा मंडळाचे अध्यक्ष राकेशजी भुजबळ, अनंत जाधव, प्रमोद भुजबळ, गोविंद भाई राजपुरोहित याची उपस्थिती लाभले.

सदैव विवाह सोहळा अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला, भुजबळवाडी मधील सर्व रहिवासी एकत्र येऊन प्रत्येक सण उत्साहाने साजरा करत असतात त्याबद्दल सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# सीकेटी ज्युनिअर कॉलेजमध्ये सजावट स्पर्धा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात नुकतेच सहशालेय विभागातर्फे दिवाळी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी आर.एस. नायकवडी व मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये पारंपरिक सणातून आनंद निर्माण करणे, पारंपारिक सणांचे जतन करणे, कलात्मक कौशल्य विकसित करणे या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली. उच्च माध्यमिक विद्यालयातील ७७ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला. आकाश कंदील बनवणे, दिवा सजावट, वॉलपीस डेकोरेशन, दिवाळी पोस्टर अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी आपल्या सुंदर व नाविन्यपूर्ण दिवाळी सजावटीतून आपली कलात्मक प्रतिभा सादर केली. सहशिक्षिका प्रतिमा पडवळ यांनी परीक्षणाचे काम केले.

या स्पर्धेत प्रचिती घोलप (अकरावी कॉमर्स) या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक, सानवी पाटील (बारावी सायन्स) हिने द्वितीय क्रमांक तर उर्वशी चवरे (अकरावी सायन्स) या विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच प्रिया तत्व (अकरावी कॉमर्स), हर्षिता कदम (अकरावी सायन्स) या दोन विद्यार्थिनींना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायन्स विभागाच्या सहशिक्षिका सविता सावंत यांनी केले. या कार्यक्रमासाठी ज्युनिअर विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून प्राचार्य निशा नायर यांचे अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या निशा नायर यांनी श्रीलंका येथे आयोजि त इंटरनॅशनल कॉन्फरेन्स व क्वालिटी एज्युकेशन २०२५ या आंतरराष्ट्रीय परिषदेत सक्रिय सहभाग घेऊन संस्थेचे व विद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. २७ ते ३१ ऑक्टोबर या पाच दिवसांच्या कालावधीत ही शैक्षणिक गुणवत्ता आधारित परिषद पार पडली.

यात देश-विदेशातून एकूण १९ शिक्षण तज्ञ आले होते. त्यापैकी भारतातून वेगवेगळया राज्यातून आठ शिक्षणतज्ज्ञ गेले होते त्यामध्ये महाराष्ट्रातून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर यांची निवड झाली होती. या परिषदेत सुमारे १५० प्राचार्य आणि उपप्राचार्यांनी देश-विदेशातून आलेल्या १९ शिक्षणतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

या शिक्षण परिषदेत प्राचार्य निशा नायर यांनी शिक्षण क्षेत्रात नवनवीन कल्पना राबविणे आणि Modern Pedagogical Approaches in Secondary Schools of Sri Lanka या रिसर्च पेपरव्दारे महत्त्वपूर्ण असे मार्गदर्शन तिथे उपस्थित असलेल्या सर्व प्राचार्य आणि उपप्राचार्यांना दिले. त्यांनी Stream Education या विषयावर महत्वपूर्ण माहिती दिली. यात विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान, वाणिज्य आणि कला या शाखांमध्ये कौशल्यावर आधारित शिक्षण देऊन सर्वांगिण विकास कसा साधता येतो, हे सांगितल. तसेच सौर उर्जेचा वापर करण्याबाबतही कल्पक विचार





सांगितला. याद्वारे शाळांना पर्यावरण पूरक उर्जा मिळेल व वीज बचत होऊन शाश्वत विकासाला चालना मिळेल अशी माहिती दिली.

या उपक्रमामुळे शिक्षण क्षेत्रात अधुनिकता, पर्यावरण जाणीव आणि सामाजिक जबाबदारींचा सुंदर संगम घडून येईल अशी महत्वपूर्ण माहिती प्राचार्यांनी आपल्या रिसर्च पेपरच्या सादरीकरणातून सर्वांना दिली.

या परिषदेत शिक्षणतज्ञ व मार्गदर्शक लाभल्यामुळे प्राचार्य निशा नायर यांचा सत्कार उवा प्रांताचे माननीय राज्यपाल कपिला जयसेकरा आणि उवा प्रांताच्या मुख्य सचिव अनुशा गोकुला फर्नांडो यांनी सत्कार करून सन्मानित केले. या परिषदेला भेट दिल्याबद्दल चेअरमन रामशेठ यांनी प्राचार्य नायर यांचे अभिनंदन केले.



**पनवेल : भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी अमोल घायाळ यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. या वेळी स्वप्नील ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व भाजप कार्यालय कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी घायाळ यांचे अभीष्टचिंतन केले.**

# विठ्ठल रखुमाई मंदिरात भक्तांची गर्दी

**उरण :** कार्तिक एकादशी शहरासह ग्रामीण भागात साजरी करण्यात आली. उरण बोरी गाव, उरण शहरातील देऊळवाडी येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. उरण तालुक्यात प्रति पंढरपुर असे भेंडखळ येथे ही विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मंदिरासमोर तुलसी पानांच्या, फुले यांची दुकाने थाटण्यात आली होती. प्रसाद वाटण्यात आला, असे पुजारी शेखर लाळे यांनी सांगितले.





**पनवेल : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक व आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र स्मृतीस माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोमवारी ऐतिहासिक रायगडावर विनम्र अभिवादन केले. या सोबतच जगदीश्वर मंदिरात दर्शन घेतले व महाराजांच्या समाधीचरणी नतमस्तक झाले. सोबत अन्य मान्यवर.**

## संपादकीय

# अखेर स्वप्न साकारले!

नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियमवर रविवारी इतिहास घडला. अखेरपर्यंत रंगलेल्या विश्वचषक अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव करत भारतीय महिला क्रिकेट संघाने प्रथमच विश्वकरंडकावर नाव कोरले आणि भारतात दिवाळीनंतर आठवडाभराने पुन्हा दिवाळी साजरी झाली. ही दिवाळी तमाम भारतीयांच्या प्रदीर्घ काळ स्मरणात राहणार आहे.

**नवी मुंबईत रविवारी दुपारी बारा वाजल्यापासून पावसाला सुरुवात झाली आणि दुपारनंतर तर पावसाचा जोर वाढलाच. पण त्यामुळे क्रिकेटच्या चाहत्यांमधील उत्साह काही कमी झाला नाही. पावसामुळे दोन तास उशीराने सुरू झालेल्या विश्वचषक अंतिम सामन्यासाठी स्टेडियम पूर्ण भरले. हे महिला क्रिकेटच्या वाढत्या लोकप्रियतेचा प्रत्यय देणारेच म्हणावे लागेल. जगज्ञेतेपदासाठीच्या या सामन्यात भारतीय महिला संघाने आक्रमण आणि संयम यांचा समतोल साधला. साखळी सामन्यांमध्ये सलग तीन पराभव पदरात पडूनही खचून न जाता भारतीय संघाने जिद्दीने अंतिम फेरीत धडक मारली आणि अभूतपूर्व विजय हासिल केला. शफाली वर्मा हिच्या ८७ धावांच्या खेळीने केलेल्या पायाभरणीला दीप्ती शर्माच्या अर्धशतकाचा हातभार लागल्याने भारताने वर्ल्ड कप महिला वनडे क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेपुढे २९९ धावांचे आव्हान ठेवले. अंतिम सामन्यातील ऐतिहासिक विजयाचे श्रेय कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्या संघाला तर जातेच, परंतु यामागे ४७ वर्षांची अनेक पिढ्यांची धडपड आहे याचीही जाणीव ठेवलेली बरी. १९७८ साली पहिल्यांदा कर्णधार डायना एडुलजी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला संघ वर्ल्ड कप स्पर्धेत उतरला होता. पण ती महिला क्रिकेटची अडखळती सुरूवात होती. त्यानंतर प्रदीर्घ काळ दुर्लक्षित राहिल्यानंतर २००५ आणि २०१७ साली भारतीय महिला संघ वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीपर्यंत पोचला. सतत हुलकावणी देणारा वर्ल्ड कप यंदा भारतीय महिला संघाने खेचून आणला ही घटना क्रिकेटच्या इतिहासातच नव्हे तर महिला सक्षमीकरणाच्या चळवळीत देखील अभूतपूर्व मानावी लागेल. क्रिकेटचे मैदान हे बहुतेक वेळा पुरुष खेळाडूंनीच गजबजलेले बघावे लागते. डी. वाय. पाटील स्टेडिअमवर रविवारी स्त्री–प्रेक्षकांची संख्या लक्षणीय दिसून आली. भारतीय संघाला चिअर–अप करणाऱ्या युवकयुवतींबरोबरच आपल्या बच्चेकंपनीला घेऊन अनेक मातादेखील आलेल्या दिसल्या. हा बदल लक्षात घेण्याजोगा आहे. वर्ल्ड कप जिंकणाऱ्या क्रिकेटतारका या येणाऱ्या पिढ्यांसाठी दीपस्तंभासारख्या असणार आहेत याचेच हे द्योतक. वर्ल्डकप जिंकल्यामुळे भारतीय संघावर बक्षिसांचा वर्षाव होत आहे. विजेतेपदाची इनामाची रक्कम जवळपास ४० कोटी रूपये इतकी आहे. त्यातच भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) भारतीय संघाला ५१ कोटींचे इनाम जाहीर केले आहे. म्हणजेच वर्ल्ड कप जिंकून काही तास उलटत नाहीत तोवर भारतीय महिला संघाला जवळपास ९१ कोटी रुपये मिळाले आहेत. हे आहे भारतीय क्रिकेटचे सध्याचे चित्र. क्रिकेट हा खेळच भारतात एक चलनी नाणे ठरते. देशांतर्गत स्पर्धा, आंतरराष्ट्रीय स्पर्धा, आयपीएलसारखे प्रायोजित सोहळे अशा असंख्य लढती क्रिकेट विश्वात होत असतात. क्रिकेटची अशी एक अर्थव्यवस्थाच निर्माण झाली आहे. या सर्व घडामोडींपासून महिला क्रिकेट आजवर काहिसे दूरच होते. हा सापत्नभाव रविवारच्या विजयामुळे नष्ट झाला ही चांगलीच बाब आहे. भारतीय महिला क्रिकेट संघाचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. कारण यामुळे फक्त क्रिकेटचा चेहरामोहरा बदलणार नसून त्याचे सकारात्मक परिणाम अन्य क्षेत्रांमध्येही दिसतील.**

# रायगड मत्स्यव्यवसाय क्लस्टर विकासाचे नवे मॉडेल




रायगड मत्स्यव्यवसाय क्लस्टर एकात्मिक मूल्य–साखळी विकासासाठी मॉडेल म्हणून उदयाला येत आहे.पायाभूत सुविधांचा विस्तार आणि बाजारपेठ जोडणीवर भर देण्यात येत आहे त्यामुळे सहकार–प्रणीत नील अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे

मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाच्या मत्स्यव्यवसाय विभागाचे केंद्रीय सचिव, डॉ. अभिलक्ष लिखी यांनी २८ ऑक्टोबर रोजी जिल्हा नियोजन सभागृह येथे रायगड जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी क्लस्टरला भेट देऊन त्याच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि सहकारी हितधारकांशी थेट संवाद साधला. हा क्लस्टर एकात्मिक मत्स्यव्यवसाय मूल्य–साखळी विकासासाठीचे मॉडेल म्हणून विकसित केले जात आहे. प्रत्यक्ष तळाच्या स्तरावरील आव्हानांचे मूल्यमापन करणे आणि सहकार–नेतृत्वाखालील दृष्टिकोनातून मत्स्यव्यवसाय–आधारित उपजीविका मजबूत करण्यासाठी संधी विचारात घेणे हा या भेटीचा उद्देश होता. संवादादरम्यान, डॉ. लिखी यांनी रायगड, महाराष्ट्रातील १५६ प्राथमिक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था आणि ९ मत्स्य शेतकरी उत्पादक संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २५१ सदस्यांची भेट घेतली.

सहकार–प्रणीत विकासासाठी सरकारच्या वचनबद्धतेवर भर देत, मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. अभिलक्ष लिखी यांनी प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना आणि मत्स्यव्यवसाय पायाभूत सुविधा विकास निधी यांसारख्या प्रमुख राष्ट्रीय उपक्रमांशी मत्स्यव्यवसाय क्लस्टरच्या उपक्रमांना जोडण्याची आवश्यकता अधोरेखित केली. मत्स्यव्यवसाय विभाग आणि सहकार मंत्रालय यांच्यातील संयुक्त कृती दल देशभरातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना बळकट करण्यासाठी सक्रियपणे कार्यरत आहे, असे त्यांनी नमूद केले. केंद्रीय गृहनिर्माण आणि सहकार मंत्री, अमित शाह यांनी काल खोल समुद्रातील मासेमारी नौकेच्या केलेल्या उद्घाटनाचा संदर्भ देत, डॉ. लिखी यांनी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था म्हणजे भारताच्या मच्छिमार समुदायाच्या प्रगती आणि समृद्धीसाठी सरकारच्या दृष्टिकोनाच्या कोनशिला असल्याचे अधोरेखित केले.

रायगडमधील मत्स्यव्यवसाय सहकारी क्लस्टरला भेट देताना, डॉ. लिखी यांनी राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळाला या योजनेची अधिक व्यापक पोहोच आणि प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये जागरूकता, प्रशिक्षण आणि तक्रार निवारण शिबिरे आयोजित करण्याचे निर्देश दिले. त्यांनी मत्स्यव्यवसाय मूल्य साखळीमध्ये एकात्मिक विकास साधण्यासाठी क्लस्टर–आधारित दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित केले आणि हितधारकांना निर्यात वाढवण्यासाठी, पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी, आर्थिक उपलब्धता वाढवण्यासाठी आणि बाजारपेठ जोडणी मजबूत करण्यासाठी नवीन कार्यपद्धती स्वीकारण्यास प्रोत्साहित केले. हितधारकांनी उपस्थित केलेल्या पायाभूत सुविधा विकासाच्या गरजांना प्राधान्य दिले जाईल अशी ग्वाही देत, त्रुटी ओळखण्यासाठी आणि सर्वांगीण, गरज–आधारित हस्तक्षेप करण्यासाठी सहकारी प्रतिनिधींसोबत संवादाच्या अनेक फेऱ्यांचा समावेश असलेल्या सल्लामसलत नियोजन प्रक्रियेची ही भेट सुरुवात असल्याचे डॉ. लिखी यांनी नमूद केले. हितधारकांनी उपस्थित केलेल्या पायाभूत सुविधा विकासांच्या गरजांना प्राधान्य देण्याची त्यांनी हमी दिली.

या कार्यक्रमात आभासी पद्धतीने सहभागी झालेले मत्स्यव्यवसाय विभागाचे संयुक्त सचिव (अंतर्देशीय मत्स्यव्यवसाय), सागर मेहरा यांनी सर्वांगीण आणि शाश्वत मत्स्यव्यवसाय विकास सुनिश्चित करण्यासाठी मंत्रालये आणि योजनांमध्ये अभिसरणाची गरज असल्याचे सांगितले. दीर्घकाळ टिकणाऱ्या व्यवहार्यतेसाठी त्यांनी तंत्रज्ञान–आधारित, अभिसरण–आधारित प्रकल्प दृष्टिकोनाचे आवाहन केले.

संयुक्त सचिव (समुद्री मत्स्यव्यवसाय), नीतू कुमारी यांनी बंदर व्यवस्थापनासाठी प्रमाणित कार्यप्रणाली विकसित करण्यावर भर दिला, ज्यामुळे मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना बंदर आणि लँडिंग केंद्रे कार्यक्षमतेने व्यवस्थापित करण्यासाठी सक्षम होतील.

राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बी.के. बेहेरा यांनी रायगडच्या मत्स्यव्यवसाय स्थितीचा आढावा सादर केला आणि पुढील पाच वर्षांमधील नियोजित प्रमुख उपाययोजना मांडल्या. यामध्ये महाराष्ट्राच्या मत्स्यव्यवसाय वाढीच्या उद्दिष्टांना अनुरूप पायाभूत सुविधांचे बळकटीकरण, शीतसाखळी आणि प्रक्रिया विकास, बाजारपेठ जोडणी आणि कल्याणकारी उपक्रमांसाठी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत प्रकल्पांचा समावेश आहे.

मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांशी झालेल्या संवादात सागरी, गोड्या पाण्यातील आणि खाऱ्या पाण्यातील विभागांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या हितधारकांचा सक्रिय सहभाग दिसून आला. यावेळी त्यांनी यशोगाथा सांगितल्या आणि रायगडमध्ये मासेमारी जेट्टी, आईस प्लांट, शीतगृह आणि ड्रेजिंग सुविधांची आवश्यकता यासह प्रमुख आव्हानांचा ठळक उल्लेख केला. सहभागींनी आरोग्य शिबिरे आणि स्वच्छता सुविधांसारख्या महिला–केंद्रित हस्तक्षेपांचे महत्त्व अधोरेखित केले आणि सर्वोत्तम पद्धतींमधून शिकण्यासाठी आणि मच्छीमारांसाठी कर्ज पुरवठा सुलभ करण्यासाठी आंध्र प्रदेशसारख्या राज्यांना प्रत्यक्ष भेट देण्याची सूचना केली. वित्तीय संस्थांनी सहकारी प्रयत्नांना बळकटी देण्यासाठी निरंतर पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले. सहकारी संरचनांना बळकटी देण्यावर आणि सहकार से समृद्धी आणि आत्मनिर्भर भारताच्या दृष्टिकोनाला अनुरूप एक लवचिक, समावेशक आणि आत्मनिर्भर मत्स्यव्यवसाय क्षेत्र निर्माण करण्यासाठी पीएमएमएसवाय टप्पा २ मध्ये स्थानिकांच्या सूचना एकत्रित करण्यावर चर्चेचा भर होता.

**मत्स्यव्यवसाय समूह विकसित करण्याचे औचित्य**

पीएमएमएसवाय अंतर्गत अधिसूचित केलेल्या इतर ३४ समूहांप्रमाणे रायगडमधील मत्स्यव्यवसाय सहकारी समूह मत्स्यपालन, सागरी शेती आणि खोल समुद्रातील मासेमारी उपक्रम एकत्रित करून सामूहिक मत्स्यपालन–आधारित उद्योगांना बळकटी देण्याच्या दृष्टीने डिझाईन केले होते. या ३४ समूहांचे प्रमुख उद्दिष्ट संपूर्ण मूल्य साखळीत एकात्मिक विकासाला चालना देऊन अधिक स्पर्धात्मक, संघटित आणि शाश्वत मत्स्योद्योग आणि मत्स्यपालन क्षेत्राला प्रोत्साहन देणे आहे. विकासाचे इंजिन अशी या समूहांची कल्पना केली आहे जे मोठ्या प्रमाणात अर्थव्यवस्था सक्षम करेल, आर्थिक व्यवहार्यता सुधारेल आणि उत्पादन आणि कापणीपासून ते प्रक्रिया, विपणन आणि निर्यातीपर्यंतची संपर्क व्यवस्था मजबूत करेल. मच्छीमार, मत्स्यपालन करणारे शेतकरी , सहकारी संस्था, एफएफपीओ, बचतगट, उद्योग आणि स्टार्ट–अप्सना एकत्र आणून, रोजगार निर्मिती, उत्पन्न वाढवणे आणि शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करण्याचे या समूहांचे उद्दिष्ट आहे. नवोन्मेष, उद्योजकता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी देखील त्यांची रचना केली आहे, जेणेकरून भारताच्या मत्स्यव्यवसाय क्षेत्राचे नील अर्थव्यवस्थेच्या एका ऊर्जाशील आणि लवचिक स्तंभात रूपांतर होण्यास गती मिळेल.

निवडण्यात आलेल्या मत्स्यव्यवसाय समूहांना बळकट करण्यासाठी, मत्स्यव्यवसाय विभाग अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, नाबार्ड आणि एमएसएमई मंत्रालयासोबत एकत्र काम करत आहे. या सहकार्याचे उद्दिष्ट पायाभूत सुविधांचा विस्तार, आर्थिक मदत पुरवणे, मूल्यवर्धनाला प्रोत्साहन देणे आणि कुशल कार्यबल तयार करून उद्योजकतेला चालना देणे, गुंतवणूक आकर्षित करणे आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्रात शाश्वत वाढीसाठी एक मजबूत स्टार्ट–अप परिसंस्था निर्माण करणे आहे.

या बैठकीला मुरुड, करंजा, उरण, श्रीवर्धन, रोहा, पेण आणि इतर प्रदेशातील मच्छीमार सहकारी संस्थांच्या मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**साभार : रायगड जिल्हा माहिती खाते, अलिबाग**



## बदलते तंत्रज्ञान

### क्रेडिट कार्ड घोटाळा म्हणजे काय?

क्रेडिट कार्ड घोटाळा हा सायबर फसवणुकीचा एक प्रकार आहे ज्यामध्ये घोटाळेबाज तुमचा कार्ड नंबर, सीव्हीव्ही, एक्सपायरीची तारीख, ओटीपी किंवा पिन यासारखी संवेदनशील माहिती फसवणूकीने मिळवतात. ते तुमच्या खात्यातून पैसे काढण्यासाठी किंवा ऑनलाइन खरेदी करण्यासाठी या माहितीचा वापर करतात.



फसवणूक करणारे बनावट कॉल, ईमेल किंवा संदेशांद्वारे तुमचे कार्ड तपशील, ओटीपी किंवा पिन मिळवतात. कधीकधी, ते स्वतःला बँक प्रतिनिधी किंवा विश्वासार्ह कंपन्या म्हणून ओळखतात आणि बनावट ऑफर किंवा रोख ऑफर देऊन तुम्हाला आमिष दाखवून तुमची माहिती मिळवतात. एकदा त्यांच्याकडे हे तपशील आले की, स्कॅमर कार्ड वापरून व्यवहार करतात आणि पैसे काढतात.

क्रेडिट कार्ड फसवणूक टाळण्यासाठी दक्षता आणि अचूक माहिती आवश्यक आहे. क्रेडिट कार्ड वापरताना थोडीशी काळजी घेतल्यास फसवणुकीपासून तुमचे संरक्षण होऊ शकते. उदाहरणार्थ:

तुमच्या कार्डची माहिती कोणाशीही शेअर करू नका

तुमचा पिन, पासवर्ड किंवा ओटीपी कधीही कोणाशीही शेअर करू नका, मग तो मित्र असो, नातेवाईक असो किंवा ज्याच्याशी तुम्ही फोनवर बोलत असाल.

बक्षीस किंवा लॉटरीच्या घोटाळ्यांना बळी पडू नका

जर कोणी तुम्हाला ईमेल किंवा मेसेज पाठवला की, तुम्ही लॉटरी जिंकली आहे किंवा पैसे मिळणार आहेत, पण तुम्हाला आधी काही कर किंवा शुल्क भरावे लागतील, तर ती फसवणूक आहे. अशा लोकांना कधीही पैसे देऊ नका.

पैसे देण्यापूर्वी विचार करा. लोक बनावट वेबसाइट किंवा लिंक्स ईमेल किंवा मेसेजद्वारे पाठवतात ज्या खऱ्या दिसत असतात. त्यावर क्लिक करू नका आणि तुमची माहिती भरू नका. खऱ्या बँका कधीही तुमची वैयक्तिक माहिती विचारून फोन किंवा ईमेल करत नाहीत.

तुमचे कार्ड कधीही नजरेआड होऊ देऊ नका जर तुम्ही तुमचे कार्ड रेस्टॉरंट किंवा पेट्रोल पंपावर देत असाल, तर ते तुमच्या समोर स्वाइप केले आहे याची खात्री करा. जर मशीन विचित्र वाटत असेल तर सावधगिरी बाळगा.

एक कार्ड ऑटोपेसाठी आणि दुसरे दैनंदिन वापरासाठी ठेवा.

# आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके



**निमित्त**

रायगड जिल्ह्यातील शिरढोण गावात आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांचा ४ नोव्हेंबर १८४५ रोजी जन्म झाला. त्यांना भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आद्य क्रांतिकारक म्हणाले जाते.

वासुदेव फडके यांचे आजोबा नजीकच्या कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार होते. लहानपणीच त्यांना कुस्ती, घोडेस्वारी आणि तलवारबाजीचे प्रशिक्षण मिळाले. माध्यमिक शिक्षण संपल्यावर ते पुण्याला आले व सदाशिव पेठेतील नरसिंह मंदिराजवळ राहून इंग्रज सरकारच्या सैन्य लेखा सेवेत भरती झाले. येथे त्यांच्यावर महादेव गोविंद रानड्यांचा प्रभाव पडला व भारताच्या खालावलेल्या आर्थिक परिस्थितीचे कारण ब्रिटिश धोरणे होती असे त्यांच्या लक्षात आले. त्याचवेळी फडके हे क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवेंच्याही प्रभावात होते. साळव्यांनी ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळवण्याचे आणि मागासलेल्या जातींनाही या लढ्यात सहभागी करून घेणे महत्त्वाचे असल्याचे फडक्यांना पटवून दिले.

सन १८७९नंतर वासुदेव फडके यांच्या कार्याला सुरुवात झाली. त्यांनी सशस्त्र पद्धत अवलंबली. यानंतर त्यांनी सरकारविरुद्ध उठाव करण्याची तयारी सुरू केली. फडके अक्कलकोट स्वामी समर्थांकडे आशीर्वाद मागण्यासाठी गेले, कारण ते दत्त उपासक होते. त्यांनी स्वामींना साष्टांग दंडवत घातले व पुढील प्रवासी निघून गेले. मग महाराष्ट्रातील तथाकथित मागासलेल्या जातींमध्ये मदत शोधली. मांग, रामोशी, धनगर, कोळी आणि इतर अनेक समाजातून त्यांनी तरुण घेतले व त्यांना शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण देऊन आपल्या सैन्यात भरती केले. अशा काहीशे सैनिकांसह त्यांनी इंग्रज सरकारविरुद्ध अधिकृतरीत्या युद्धाची घोषणा केली. शिरुर आणि खेड तालुक्यातील सरकारी खजिन्यावर धाड टाकून फडक्यांच्या सैन्याने आपला चरितार्थ चालवला. त्यानंतर त्यांनी थेट पुण्यावर चाल केली आणि काही दिवसांकरिता शहरावर कब्जा मिळवला. एकाच वेळी अनेक ठिकाणी हल्ला चढवून इंग्रज सरकारचे लक्ष विकेंद्रित करण्याच्या त्यांच्या चालीला यश मिळाले नाही घानूर गावाजवळ झालेल्या हातोहातच्या लढाईनंतर भारतीयांत फितुरी लावण्यासाठी सरकारने फडक्यांना पकडून देण्याबद्दल इनाम जाहीर केले. याला प्रत्युत्तर म्हणून फडक्यांनी मुंबईच्या गव्हर्नरला पकडून देणाऱ्यास त्याहून मोठे इनाम जाहीर केले.

२३ जुलै १८७९ रोजी विजापूरजवळील देवर नावडगी या गावाच्या बाहेर एका बौद्ध विहारामध्ये गाढ झोपेत असताना त्यांना अटक करण्यात आले व पुण्याच्या तुरुंगात ठेवले. तेथे त्याच्यावर खटला चालवण्यात आला. फाशीची शिक्षा टळून त्यांना आजीवन कारावास व तडीपारीची शिक्षा झाली. येमेन देशातील एडन येथील तुरुंगात पाठवण्यात आले. तेथे एकांतवासाची शिक्षा भोगत असलेल्या फडक्यांनी एके दिवशी आपल्या कोठडीचे दार बिजागऱ्यांसकट उचकटून काढून तुरुंगातून पळ काढला. काही दिवसांनी इंग्रजांनी त्यांना परत पकडले व पुन्हा तुरुंगात टाकले. तेथे आपल्याला मिळत असलेल्या वागणुकीविरुद्ध वासुदेव बळवंत फडक्यांनी आमरण उपोषण केले व त्यांचा १७ फेब्रुवारी १८८३ रोजी मृत्यू झाला. (साभार विकिपीडिया)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### पोटाची चरबी वाढतेय? ‘ही’ पद्धत एकदा वापरून पाहा

पोटाची चरबी कमी करण्यासाठी आज आपण ५–२०–३० या पद्धतीची ओळख करून घेणार आहोत. या पद्धतीमध्ये आठवड्यातून पाच दिवस २० मिनिटे वजन उचलणे आणि ३० मिनिटे चालणे याचा समावेश आहे. जर तुम्ही चांगल्या जेवणाबरोबर हे सातत्याने केले तर तुमचे बेली फॅट्स कमी होतील, असे फॅट लॉसतज्ज्ञ जॉन विल्यम्स म्हणाले.



**दिवस एक आणि चार**

२०–मिनिटांचे सर्किट ट्रेनिंग, ३० मिनिटांच्या कामासाठी टाईमर सेट करा व १५ मिनिटे विश्रांती घ्या, अप्पर बॉडी व शरीराच्या प्रत्येक भागासाठी एक व्यायाम निवडा, चेस्ट–पुश–अप्स, बॅक–डंबेल रो, शोल्डर– शोल्डर प्रेस, ट्रायसेप डंबेल किकबॅक्स, बायसेप– बायसेप कर्ल्स.

**दिवस दोन आणि पाच**

लोअर बॉडी (पायांसाठी पाच व्यायाम निवडा) स्क्वाट्स, वॉकिंग लंजेस, साईड लंजेस, सिंगल लेग ब्रिज, सिंगल लेग ब्रिज.

**दिवस तीन (कार्डिओ)**

क्रंच, बाईसिकल, प्लँक, साईड प्लँक, साईड प्लँक.

डॉ. कपिल कुमार कुर्सीवाल, वरिष्ठ सल्लागार, जीआय शस्त्रक्रिया, जीआय ऑन्कोलॉजी, बॅरिएट्रिक आणि मिनिमल प्रवेश शस्त्रक्रिया, धरमशिला नारायण हॉस्पिटल, दिल्ली यांनी बेली फॅट्स कमी करण्यासाठी ५–२०–३० पद्धत ही एक हाय–इंटेन्सिटी इंटरव्हल ट्रेनिंग स्ट्रॅटेजी आहे, जी जास्तीत जास्त फॅट बर्न करण्यासाठी मदत करते, असे सांगितले.

यात इंटरवल्सचे पाच राऊंड आहेत, ज्यात प्रत्येकी ३० सेकंदाचा कमी तीव्रतेचा व्यायाम (जसे की जॉगिंग किंवा जलद चालणे), २० सेकंदांचा मध्यम–तीव्रतेचा व्यायाम (जसे की धावणे किंवा सायकल चालवणे) आणि ५ सेकंदांचा उच्च–तीव्रतेचा स्फोट (जसे. धावणे).

फळे, भाज्या आणि संपूर्ण धान्य यांसारख्या वनस्पती आधारित पदार्थांवर लक्ष केंद्रित करा. मासे आणि लो–फॅट डेअरी प्रोडक्ट्स यासारखे प्रथिनांचे स्त्रोत निवडा. प्रोसेस्ड मांस, तसेच मांस आणि जास्त फॅट्स असलेले दुग्धजन्य पदार्थ, जसे की चीज आणि बटरमध्ये आढळणारे फॅट्स मर्यादित करा. मध्यम मोनोअनसॅच्युरेटेड आणि पॉलीअनसॅच्युरेटेड फॅट्स निवडणे. हे फॅट्स मासे, नट्स आणि विशिष्ट वनस्पती तेलांमध्ये आढळतात.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांची महाड भाजप कार्यालयाला सदिच्छा भेट

**महाड : प्रतिनिधी**

भाजपचे वरिष्ठ नेते, रायगड लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे सोमवारी (दि. ३) सायंकाळी महाड येथे आले असता, त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या चवदारतळे येथील कार्यालयाला सदिच्छा भेट देऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी या कार्यालयासाठी आर्थिक मदतदेखील जाहीर केली.



रायगड लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे सोमवारी सायंकाळी महाड येथे आले होते. त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या चवदारतळे येथील कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून रामशेठ ठाकूर यांचे स्वागत व सन्मान करण्यात आला.

दरम्यान, महाड नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यांच्यासमवेत भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी आपल्या भावना व्यक्त करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ऐतिहासिक महाड भूमीमध्ये भाजपचे एक सुसज्ज व भव्य असे पक्ष कार्यालय असावे अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली व त्यासाठी आपण १० लाखांचा निधी देणगी स्वरूपात देत असल्याचेदेखील त्यांनी जाहीर केले. त्यांच्या या मदतीमुळे भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्याची भावना निर्माण झाली असून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मी सदैव तुमच्यासोबत आहे. कुठल्याही प्रकारची अडचण अथवा समस्या निर्माण झाल्यास मला संपर्क करावा, असा विश्वास या वेळी कार्यकर्त्यांमध्ये निर्माण केला.

या वेळी भाजप महाड तालुका अध्यक्ष निलेश तळवटकर, जिल्हा उपाध्यक्ष मंजुषा कुद्रीमोती, कल्पना विचारे, माजी सरचिटणीस महेश शिंदे, भाजपचे सुमित पवार, शहर चिटणीस ॲड. आदित्य भाटे, अक्षय ताडफळे, श्रीकांत सहस्त्रबुद्धे आदी उपस्थित होते.

## वावेदिवाळी येथे केबलची चोरी

**माणगाव : बातमीदार**

इंदापूर विभागातील वावेदिवाळी गावात बोअरिंग पंप चोरानी शनिवार दि.१ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या सुमारास वावेदिवाळी ग्रामपंचायत कार्यालयाच्या आवारातील एक बोअरिंग पंप रस्सीने ओढून तो बाजूला ठेवला व त्याची केबल कापली तसेच काही अंतरावर असलेल्या वावे दिवाळीचे माजी महात्मा गांधी तंटामुक्त अध्यक्ष प्रमोद सावंत यांच्या गेल्या अनेक वर्षापूर्वीपासून पोल्ट्री फार्ममध्ये असलेल्या बोअरिंगचेदेखील पंप बाहेर काढून त्या पंपाची केबल चोरटे घेऊन पसार झाले.

## पोलादपूर नगरपंचायतीतर्फे पुन्हा मालमत्ता करवाढीच्या नोटीस जारी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

नगरपंचायत पोलादपूरतर्फे गेल्यावर्षीप्रमाणे यंदाही नागरिकांना मालमत्ताकर वाढीच्या नोटीसा बजावण्यात आल्या असून या नोटीशीवरील हरकती ११ नोव्हेंबर २०२५ पर्यंत विहित नमून्यातील लेखी स्वरूपात हरकती घेण्यासंदर्भातील आवश्यक दस्तावेजामध्ये गेल्यावर्षीपर्यंत मालमत्ता करआकारणी आक्षेपार्ह असल्याने तसेच मालमत्ता कराबाबत नागरिकांमध्ये संग्दिधता असल्याने असंख्य नागरिकांनी करनिश्चिती झाल्याखेरीज करभरणा करण्याचे टाळले असताना मागील वर्षापर्यंतच्या करभरणा पावतीची सक्ती करण्यात आली आहे. यामागे नागरिकांना यावर्षी आक्षेप घेता येऊ नये, असा नगरपंचायतीच्या ठेकेदारांचा कुटील हेतू दिसून येत आहे.

पोलादपूर शहरातील विविध प्रभागांतून नगरपंचायतीने नेमलेल्या खासगी ठेकेदाराकडून दोन-चार तरूणांमार्फत तीन वर्षांपूर्वी नागरिकांच्या घरांची मोजणी लेझर यंत्राद्वारे झाल्यानंतर घरांचे पुनर्मुल्यांकन करण्याची प्रक्रिया संबंधित ठेकेदाराने पूर्ण करून महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५चे कलम १०६ अ अन्वये सन २०२७-२९ मध्ये आकारण्याच्या मालमत्ता कराची रक्कम अनाकलनीयरित्या निर्धारित केली. त्या रक्कमेच्या २० टक्के रकमेची आकारणी घरपट्टी म्हणून सन २०२४-२५ मध्ये आकारण्यात येणार असल्याचे मागील नोटीशीमध्ये नमूद केले असताना यंदा पाठविलेल्या नोटीशीमध्ये तशी वाढ करण्यात आल्याचे दिसून येत आहे. या रक्कमेमध्ये इमारत ३० ते ५० वर्षे जुनी असल्याकडे दूर्लक्ष करून नवीन असल्याचा गैरसमज कायम ठेऊन पहिल्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी म्हणजे २०२५-२६, २०२६-२७ आणि २०२७-२८ या वर्षी या इमारतींना घसारा ० टक्के ठेवण्यात येणार असून त्यानंतर काही टक्के घसारा वजा करण्याचे उपकार ८० टक्के अधिक घरपट्टी आकारणीवेळी होणार आहे.

यंदा नगरपंचायत पोलादपूरतर्फे पाठविण्यात आलेल्या नोटीशीमध्ये नागरिकांच्या घराची करआकारणी व फेरफाराबाबत तक्रार तसेच नावात दुरूस्ती असल्यास त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास सदर कारणे नमूद करून लेखी स्वरूपात मुख्याधिकारी पोलादपूर नगरपंचायत यांच्याकडे दि.११ नोव्हेंबर पर्यंत सादर करून पोचपावती घेण्यासंदर्भात आवाहन करताना लेखी हरकत न आल्यास प्रस्तावित करआकारणी नागरिकांना मंजूर असल्याचे समजण्यात येऊन प्रस्तावित कर आकारणी कायम करण्यात येईल,

अशी नागरिकांना तंबी देताना नगरपंचायत कार्यालयामध्ये कर विभागात फक्त स्वत:च्या मालकीच्या घर व जागेवरील करआकारणी पाहावयास उपलब्ध आहे, मागील वर्षीपर्यत करभरणा केल्याची पावती जोडल्याखेरिज हरकत घेता येणार नाही.

## अहिल्यानगर वकील मारहाणीचा माणगाव वकील संघटनेकडून निषेध



**माणगाव : बातमीदार**

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुका कोर्टात वकिलास एका पक्षकारांकडून जबर माराहाण झाली असल्याने या घटनेचा निषेध म्हणून माणगांव बार असोसिएशन कडून सोमवार दि.३ नोव्हेंबर रोजी माणगांव जिल्हा सत्र न्यायालयच्या प्रांगणात वकीलांनी एकत्र येऊन या घटनेचा लाल फिती बांधून जाहीर निषेध केला.

यावेळी माणागांव बार असोसिएशनचे अध्यक्ष मोहन मेथा यांनी निषेध व्यक्त करताना सांगितले की, अहिल्या नगर जिल्हातील शेवगाव कोर्टातील वकिल यांना एका पक्षकाराने मारहाण केल्याने आम्ही माणगांव तालुक्यातील वकिल या घटनेचा जाहीर निषेध करत आहोत. न्यायपालिका हा देशातील सर्वात मोठा स्तंभ असून न्यायपालिके मार्फत सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचे काम केले जाते आणि त्याच पवित्र न्याय स्तंभाचे आम्ही घटक असताना अशा प्रकारच्या जर का घटना घडत असतील तर ते निषेधार्थ आहे.बार कौन्सिल महाराष्ट्र , गोवाच्या निर्देशा प्रमाणे आम्ही हा निषेध नोंदवत असून विधि मंडळाला आमची अशी विनंती असेल की त्यांनी लवकरच वकिल सर्वक्षण कायदा पारीत करावा. यावेळी वकिल संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते

## 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक भावी पिढीसाठी प्रेरक'



**मुरुड : प्रतिनिधी**

बौद्ध समाज सेवा संघाची गेले कित्येक वर्ष रखडलेले महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याची संधी मला मिळाली हे ऐतिहासिक स्मारक भावी पिढीसाठी प्रेरक ठरेल कारण या वास्तु मधून युपीएससी व एम.पी.एस.सी विद्यार्थी तयार होऊन आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करतील. तसेच विद्या विभूषित युवा वर्ग इथे तयार होतील असा दृढ विश्वास अलिबाग - मुरुड मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांनी व्यक्त केला .

मुरुड - जंजिरा नगरपरिषद व मुरुड तालुका बौद्ध समाज सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर स्मारक लोकार्पण सोहळा समारंभात ते बोलत होते . मुरुड शहरात सुमारे सात कोटी रुपये खर्च करून बौद्ध समाजासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक बांधण्यात आले आहे. या स्मारकाचे लोकार्पण सोहळ्यात आमदार दळवी आपले विचार व्यक्त करत होते.

यावेळी व्यासपीठावर आमदार महेंद्र दळवी, माजी उपमहापौर पनवेल महानगर पालिका जगदिश गायकवाड , जयभीम आर्मीचे अध्यक्ष नितीन मोरे, भाजप चे रायगड जिल्हा दक्षिण जिल्हाप्रमुख ॲड. महेश मोहिते, शिवसेनेचे रायगड जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे,मुरुड तालुका प्रमुख निलेश घाटवळ,शिवसेना युवा नेते विघनेश माळी, मुख्याधिकारी सचिन बच्छाव , ॲड. बबन शिंदे ,किशोर शिंदे, मंगेश येलवे , माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील , वरिष्ठ पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे ,शिवसेनेचे बांधकाम प्रमुख अध्यक्ष दिनेश मिणमीने,मुरुड शहर अध्यक्ष संदीप पाटील, युवा सेना मुरुड शहर प्रमुख ओम पाटील,सक्रीय कार्यकर्ते महेश पाटील मान्यवर उपस्थित होते .आपल्या भाषणात आमदार दळवी म्हणाले की स्मारकासाठी,५, कोटी खर्च झाले असुन २ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत .४ कोटींचा निधी लवकरच प्राप्त होईल अशी माहिती दिली .मुरुड शहरामध्ये ३३० कोटींची विकास कामे केल्यामुळे जनता माझ्या पाठीशी आहे असा आत्मविश्वास दळवी यांनी व्यक्त केला आहे.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग पिन कोड - ४०२ २०१**

ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :- (०२१४१)२२२०८४/२२५०९६

**ई-निविदा सूचना क्र. १७ सन २०२५-२०२६** (प्रथम निविदा/दुबार निविदा)

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत कंत्राटदार/ कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १. | तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय पेण या कार्यालयाचे नवीन इमारतीचे बांधकाम करणे ता. पेण जि. रायगड (प्रथम निविदा) | २,३३,०६,५८५/- |
| २ | अलिबाग रेवदंडा रस्ता प्र.रा.मा. ४ या रस्त्यावरील कि.मी. ०/६०० मधील बेली पुलाची पुर्नबांधणी करणे ता. अलिबाग, जि. रायगड (दुबार निविदा) | ६,०१,६२,४९४/- |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :** दिनांक ३.११.२०२५ (स.१०.०० ) ते दिनांक १०.११.२०२५ (सं.१८.००)
**(अ.क्र.२)** मा.मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दि.४.११.२०२५ रोजी दु. १२.०० वाजता
**(अ.क्र. १)** (अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे दालनात दि. ६.११.२०२५ रोजी दु. १५.०० वाजता)

**ई-निविदा उघडणे :** दिनांक १२.११.२०२५ (दु.३.०० वा.) (अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे दालनात)

खालील संकेतस्थळावर ई- निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल. )
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./ सा.बां./अवि/निविदा/ ४७५७/२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, अलिबाग - ४०२ २०१
दिनांक :- २९/१०/२०२५ क्र. आरओसी-२०२५-२६/क्र.-५/सी ३७१४

सही/-
**(एम.एम.धायतडक)**
कार्यकारी अभियंता,
सा. बां. विभाग, अलिबाग, जि.रायगड



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ५५/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे या कामा करीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचेनांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | दिघी बंदराभिमुख औद्योगिक क्षेत्र (डिपीआयए)... महाराष्ट्र राज्यातील दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र, क्लस्टर क्रमांक ५ तालुका माणगाव व रोहा, जिल्हा रायगड येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे आगामी अल्ट्रा-मॉडर्न इको-फ्रेंडली औद्योगिक उद्यानाच्या इक्विटी इन्फ्युजन, विकास, ऑपरेशन, देखभाल व व्यवस्थापनासाठी भारतीय/आंतरराष्ट्रीय विकासकांकडून बांधा, वापरा व हस्तांतरीत करणे (पीपीपी) तत्वावर "सामाजिक भागीदाराची निवड" करण्यासाठी प्रस्तावाची विनंती. | ₹ ०.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०४/११/२०२५ ते दिनांक १९/१२/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०९/१२/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. पुर्व अहर्ता बैठक दिनांक १२/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता अधिक्षक अभियंता (कों), मऔविम, पनवेल यांचे कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १२/१२/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



**जाहीर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. मुकेश राममूरत यादव, राजेश जगन्नाथ गुप्ता, शशी रंजन विश्वनाथ द्धिवेडी** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : हरिश्चंद्र पिंपळे (५५३३२६)**
(PU-ID : 36416371628), तालुका - उरण, जिल्हा - रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४८/२ | १ | ०.३३.६० पो.ख. ०.०१.०० एकूण ०.३४.६० | ४.५६ |
| **एकुण क्षेत्र ३४.६० गुंठे** | | | |
| खाते क्र. ४४१ | | ०.१६.०० पो.ख. ०.००.०० **एकूण ०.१६.००** | २.१७ |

श्री. मुकेश राममूरत यादव व इतर २ यांच्या नावे एकुण क्षेत्रापैकी विक्रीस असलेले क्षेत्र ०.१६.०० गुंठे

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/११/२०२५

सही/-
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस.,भूखंड क्रमांक - ३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
मो. क्र. ९९२०४७५८०१



**जाहीर नोटीस**
**उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**

आरटीएस अपिल क्र. १४४/२०२५

१) श्री. प्रविण केशव सावळेकर
रा. खोली क्र.५, इमारत क्र.५, पटेल पार्क गोकर्णे सोसायटी, परदेशी अळी, पनवेल- ४१०२०६.
२) सौ. माधुरी दिगंबर गमरे,
रा. ७/१२, प्लोसंट पार्क, भैरोबानाला, वनवोरीये, पुणे- ४११०१३.
३) सौ. सुवर्णा सदानंद शिर्के
रा. ३९०२, टावर- ८ (अथेना), रुणवाल ऐरेने, युनिवरसिटी रोड, बाळकुम, ठाणे (प)- ४००६०८.
४) सौ. पूनम बसंत किरनळी.
रा. सत्यकिरण सोसायटी, प्लॉट क्र. २, रूम नं. १०१, पहिला मजला, सेक्टर-१२, माथेरान रोड, अदई सर्कल, नविन पनवेल - ४१०२०६, जिल्हा रायगड.
५) सौ. प्रिया सुनील कासारे
रा. द रोज, बी-विंग, रूम नं. ६०६, पोरवाल रोड, रियल मार्ट समोर, अजिंक्य डि.वाय. पाटील युनिव्हरसिटीच्या बाजूला, लोहगाव, पुणे-४११०४७.
६) सौ. सुनायना नितांत भोसले
रा. १७/१३१, उन्नत नगर पार्ट-३, एम.जी. रोड, गोरेगाव (प.), मुंबई. मो.नं. ९९३००१९८५९
७) सौ. कल्याणी विशाल गायकवाड,
रा. आशीर्वाद बिल्डिंग क्र. ३०, गजानन महाराज मंदिरसमोर, अनु क्र. ३७, एकता कॉलोनी, काळेबोराटे नगर, काळेपाडाल, हडपसर, पुणे-४११०२८.
८) श्री. पराग प्रभाकर तांबे
रा. विद्या विलास बिल्डिंग, गजानन महाराज मंदिर समोर, अनु क्र. ३७/१६/२९, एकता कॉलनी, काळेबोराटे नगर, काळेपाडाल, हडपसर, पुणे- ४११०२८.
९) सौ. दिप्ती प्रशांत जाधव,
रा. मनिषा टेरेस, रूम नं. ४४, मोलेडीना रोड, एस.जी.एस. मॉल समोर, पुणे कॅम्प - ४११००१. ........................ **वादी**

**विरुध्द**

१) सौ. अमृता अविनाश भातणकर, २) श्री. संतोष रघुनाथ भातणकर, ३) सौ. अरुणा रविकांत मोरे, ४) सौ. छाया गणपत कासारे, ५) सौ. धनश्री ज्ञानदेव घरत, ६) सौ. मिनाक्षी शिवराज कांबळे, ७) सौ. सुप्रिया शशिकांत निकाळजे, ८) श्री. विश्वास लक्ष्मीकांत भातणकर, ९) श्री. आशा प्रकाश मोरे, १०) सौ. कल्पना बलराज भातणकर, ११) श्री. रोहित बलराज भातणकर, १२) श्री. चिराग बलराज भातणकर, १३) श्री. प्रतिक बलराज भातणकर, १४) श्री. सिद्धांत दिनेश भातणकर, १५) यशवदाबाई भानुराम शिरवळे, १६) ताराबाई कृष्णाजी देवळेकर, १७) मनोरमा गणेश जाधव,

क्र.१ ते १७ सर्व रा. घर क्रमांक १४९९, भातणकर वाडा, छत्रपती शिवाजी रोड, पनवेल एस.टी. स्टँडजवळ, पनवेल - ४१०२०६
१८. श्री. प्रभाकर कृष्णाजी तांबे,
रा.३७/१६/२९,एकता कॉलनी, काळे बोराटे नगर, गजानन महाराज मंदिर जवळ, हडपसर पूणे ४११०२८ ................... **प्रतिवादी**

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे - आकुर्ली, ता. पनवेल, जि. रायगड येथिल फेरफार नोंद क्र. २५७८ दि. १८/०६/२०२१ चे विरुध्द अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तूतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत. प्रस्तूत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही **दिनांक २४/११/२०२५** रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे - आकुर्ली, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १०१ | ० | ०.०९.० | ०.९४ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण :- पनवेल.
दिनांक :- ३१/१०/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**

# नामसाधर्म्यातून एकाची शेती झाली दुसऱ्याच्या नावे

**कळंबोली : बातमीदार**

शेतकऱ्यांना शासनाच्या सर्व योजना माहिती व महत्त्वाच्या नोंदी एकाच ठिकाणी मिळाव्यात यासाठी फार्मर आयडी काढण्याची मोहीम राज्यात सुरू आहे, मात्र कळंबोलीतल्या निवृत्त शिक्षक असलेल्या शेतकऱ्याचे अहिल्यानगर जिल्ह्यात फार्मर आयडी काढताना तब्बल २० एकर शेती दुसऱ्याच्या नावे झाल्याने शेतकऱ्याचे धाबे दणाणले आहेत.

फार्मर आयडीच नाही आणि शेतीत स्वतःच्या नावावर नाही त्यामुळे शासनाच्या मिळणाऱ्या विविध मदतीपासूनही हे शेतकरी वंचित राहिले आहेत, मात्र संबंधित तलाठ्याशी संपर्क साधला असता शासनाची दुरुस्ती करण्याची वेबसाईट ही बंद असल्याने आता तरी आमच्याकडून कोणतीच उपाययोजना करता येत नसल्याचे सांगण्यात आले आहे.



कळंबोली वसाहतीमधील अशोक कारभारी घोडके हे एका विद्यालयातून निवृत्त शिक्षक आहेत. त्यांची शेतजमीन पाथर्डी तालुक्यातील रांजणी गावात आहे. सद्यस्थितीत शासनाकडून फार्मर आयडीची सक्ती केली जात आहे. त्यामुळे ते फार्मर आयडी काढण्यासाठी पाथर्डी तालुका तहसील कार्यालयामध्ये जाऊन आले. त्यांची संयुक्तिक २० एकर जागा रांजणी गावात आहे. त्यांच्या शेतीचे फार्मर आयडी काढत असताना नाम सारखेच असल्याने त्यांचे विविध आठ सर्वे नंबरची एकूण २० एकर जमीन ही अशोक कारभारी घोडके या अन्य शेतकऱ्यांच्या नावावर झाली आहे.

याबाबतची तक्रार त्यांनी ऑगस्ट महिन्यातच त्वरित अहिल्यानगर जिल्हाधिकारी पाथर्डी तहसीलदार व रांजणी तलाठी यांच्याकडे लेखी स्वरूपात केलेली आहे. स्वतःची शेत जमीन नाव सारखे असणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर झाल्याने अशोक कारभारी घोडके यांचे सर्वच कुटुंबीय तणावाखाली आहेत. ते वारंवार संबंधित अधिकारी यांना भेटत आहेत, परंतु फार्मर आयडी काढणारी ॲग्रीस्टिक नावाच्या कंपनीची वेबसाईट ही दुरुस्ती करण्याकरता बंद असल्याचे सांगण्यात येते. नुकत्याच झालेल्या पावसाने त्यांच्या शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. शासनाकडून सर्व नुकसान भरपाई देण्यात येत आहे, परंतु या शेतकऱ्यांचा फार्मर आयडी निघाला नसल्याने त्यांना शासनाकडून मिळणाऱ्या सर्व मदतीस मुकावे लागणार आहे.

शासनाने त्वरित अग्रीस्टिक कंपनीच्या व्यवस्थापनाला सांगून राज्यातील ज्यांच्या ज्यांच्या शेतकऱ्यांच्या फार्मर आयडी करताना चुका झालेले आहेत त्यात त्वरित दुरुस्त करण्याचे आदेश काढण्याची मागणी राज्यभरातील शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना नाहक मनस्ताप देणाऱ्या संबंधित ग्रीस्टिक कंपनीच्या भोंगळ कारभार बाबत सखोल चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्याची मागणी शेतकरी वर्गाकडून केली जात आहे.

> *ही जमीन सातबारावर आठ अ नमुन्यावर अशोक कारभारी घोडके यांच्याच नावावर आहे. त्यांची शेत जमीन दुसऱ्या कोणाच्याच नावावर होणार नाही, परंतु ग्रीस्टिक कंपनीच्या वेबसाईटवर दुरुस्तीचा पर्याय उपलब्ध नसल्याने आम्ही कसे काय काम करणार? जेव्हा वेबसाईटवर दुरुस्तीच्या पर्याय उपलब्ध होईल त्यावेळेस तातडीने अशोक कारभारी घोडके यांच्याबाबत झालेली चूक दुरुस्त करण्यात येईल व त्यांना शासनाकडून मिळणाऱ्या सर्व सोयी, सुविधा, मदत मिळवून देण्यात येतील.*
> ***-कालीचंद मखरे**, तलाठी, रांजणी गाव*

# रसायनीतील एचआयएल कंपनीत चोरी

## आठ जण जेरबंद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भारत सरकारची रसायनी येथील एच. आय. एल.(हिल) इंडिया लिमिटेड कंपनीच्या आवारात चोरी करणाऱ्या आठ चोरांना रसायनी पोलिसांनी मुद्देमालासह अटक केली आहे. याप्रकरणी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार मध्यरात्रीला चोरट्यांनी एच. आय. एल. कंपनीच्या आवारात प्रवेश केला. त्यांनी २१,००० रुपये किमतीचे कॉपर वायरचे दोन बंडल आणि कापलेले तुकडे (प्लास्टिकचे

काळे आवरण असलेले, एकूण ३० किलो वजनाचे) चोरले. तसेच, एका जुन्या टेम्पोमधून ५,६०० रुपये किमतीची आठ किलो वजनाची कॉपर वायर (प्लास्टिकचे आवरण असलेली) चोरून नेत असताना पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. एकूण २६,६०० रुपयांच्या मुद्देमालासह आरोपींना अटक करण्यात आली आहे.

दीप भगवान सोनावळे, राज किशोर जगदीश वर्मा, अकबर मोहम्मद जावेद खान, बकरीदी उर्फ अमील शाकीर अली शेख, मोहम्मद अल्ताफ शेख, अदनान जाहीर खान, अमन मेश सरोज, अभिषेक रामू चौरसिया अशी चोरांची नावे आहेत.

या घटनेतील टेम्पो घेऊन पळून गेलेल्या एका अज्ञात इसमाचा पोलीस शोध घेत आहेत. या आठ जणांवर रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मंगेश बाचकर हे करीत आहेत.

# एपीएमसी पोलिसांनी राबवले सायबर सुरक्षा जनजागृती अभियान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील एपीएमसी पोलिस, तुर्भे आणि एपीएमसी परिसरात सातत्याने सायबर सुरक्षेबाबत जनजागृती अभियान राबवत आहेत. पोलिसांनी तुर्भे गावात आयोजित भागवत कथेदरम्यान तसेच एपीएमसी परिसरातील विविध कार्यालयांमध्ये जाऊन नागरिक, कर्मचारी व विद्यार्थी यांच्यात जागृती निर्माण केली. या अभियानांतर्गत ऑनलाईन फसवणुकीपासून बचाव करण्याचे विविध उपाय सविस्तर समजावून सांगण्यात आले.

अभियानादरम्यान लोकांना सांगण्यात आले की, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस ओटीपी किंवा वैयक्तिक माहिती देऊ नका, अज्ञात लिंकवर क्लिक करू नका आणि डिजिटल अरेस्टच्या नावाखाली घाबरून कोणतेही आर्थिक व्यवहार करू नका. तसेच बनावट गुंतवणूक योजना, दुप्पट पैसे देण्याचे आमिष किंवा झटपट कर्ज देणारे संदेश यांपासून सावध राहा.

त्यांनी सांगितले की, जर कधी सायबर फसवणुकीचा बळी पडलात तर तत्काळ जवळच्या पोलिस ठाण्यात संपर्क साधा किंवा १९३० किंवा १९४५ या क्रमांकांवर संपर्क करून माहिती द्या. या प्रसंगी वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजय शिंदे यांनी सांगितले की, आज प्रत्येकाच्या हातात मोबाईल डिव्हाइस आहे आणि त्याबद्दल संपूर्ण माहिती नसल्याचा फायदा सायबर गुन्हेगार घेतात. पोलिस विभागाकडून सतत जनजागृती केली जात आहे. आपण पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन केले, तर कुणालाही आपली फसवणूक करता येणार नाही.

# उलवे पोलिसांकडून नागरी सुरक्षिततेसाठी दुहेरी उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी उलवे पोलिसांकडून दोन महत्त्वाचे उपक्रम राबवण्यात आले. एकीकडे सायबर गुन्ह्यांपासून जनजागृतीसाठी 'सायबर सुरक्षा जनजागृती अभियान' राबवण्यात आले, तर दुसरीकडे कायदा व सुव्यवस्था नियंत्रणासाठी 'दंगा काबू' योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली.

पोलिसांच्या वतीने रिलायन्स डिजिटल मॉल, शगुन चौक, उलवा येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वपोनि. अर्जुन रजाने यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अनिल राजुरे, एएसआय साळवे यांनी सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात नागरिकांना मोबाईल, इंटरनेट, ऑनलाइन शॉपिंग, सोशल मीडिया फ्रॉड, मालवेअर, फोन पे, गुगल पे फसवणूक, ऑनलाइन ट्रेडिंग आणि डिजिटल अरेस्ट फ्रॉड यासारख्या वाढत्या सायबर गुन्ह्यांबाबत माहिती देण्यात आली. या जनजागृती मोहिमेत रिलायन्स डिजिटल मॉलचे ४० कर्मचारी सहभागी झाले होते. त्यानंतर सेक्टर ५, जिओ टॉवर परिसरात 'दंगा काबू' योजना अंतर्गत रंगीत तालीम घेण्यात आली.

या सरावात उलवा पोलीस ठाण्याचे एक पोलीस निरीक्षक, चार सहाय्यक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक, ३० पोलीस अंमलदार, तसेच सिडको अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच कोपर हॉस्पिटलची रुग्णवाहिकेचे पथक सहभागी झाले होते.

# नवी मुंबई पोलीस दलात ५२७ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



नवी मुंबई पोलीस दलात नवीन उमेदवारांना संधी मिळणार आहे. पोलीस आयुक्त कार्यालयाने २०२४-२०२५ या वर्षासाठी ५२७ विविध पदांसाठी पोलीस भरती प्रक्रिया सुरू केल्याची अधिकृत माहिती दिली आहे. या भरतीमध्ये पोलीस शिपाई, चालक पोलीस शिपाई आणि बॅण्डस्मन अशा विविध पदांचा समावेश आहे.

नवी मुंबई पोलीस दलात ४५०० हजार पोलीस कर्मचारी आणि ३५० अधिकारी कार्यरत आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे स्वतंत्र विमानतळ पोलीस ठाणे आणि उलवा पोलीस ठाण्यांच्या निर्मितीनंतर अजूनही तीन पोलीस ठाण्यांचा विस्तार नवी मुंबई पोलीस दलाच्या कार्यकक्षेत होणार आहे. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी तीन पोलीस परिमंडळाची रचना केल्यानंतर वाढत्या लोकसंख्येमुळे पोलीस बळ सुद्धा वाढवावे लागणार असल्याने ५२७ पदांच्या भरतीमुळे पोलिसांच्या सूरक्षेचे कडे अजून मजबूत होईल.

नवी मुंबई पोलीस दलाने जाहीर केलेल्या भरती प्रक्रियेनुसार, पोलीस शिपाईच्या ४३९ जागा, चालक पोलीस शिपाईच्या ८२ जागा, तसेच बॅण्डस्मनच्या ६ जागा उपलब्ध आहेत. या पदांसाठी पात्र उमेदवारांचे ऑनलाईन अर्ज ३० नोव्हेंबरपर्यंत स्वीकारले जाणार आहेत.

भरती प्रक्रियेविषयी सर्व सविस्तर माहिती policerecruitment2025.mahait.org तसेच http://www.mahapolice.gov.in या अधिकृत संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांना ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज सादर करावा लागणार आहे. अर्ज सादर करण्याची संपूर्ण प्रक्रिया, आवश्यक पात्रता निकष, शारीरिक चाचणी, लेखी परीक्षा आणि इतर मार्गदर्शक सूचना संबंधित संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

ही भरती प्रक्रिया पोलीस सह आयुक्त संजय येनपुरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडली जाणार आहे. नवी मुंबईतील तरुणांसाठी ही भरती एक सुवर्णसंधी ठरणार असून, इच्छुक उमेदवारांनी निर्धारित वेळेत अर्ज सादर करण्याचे आवाहन पोलीस विभागाकडून करण्यात आले आहे.

# सानपाडा येथे महिला उद्योग मार्गदर्शन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा येथे नवनीत प्रतिष्ठान आणि सहकार भारती नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिलासाठी उद्योग मार्गदर्शन शिबिराचे आयोजन रविवारी (दि.२) करण्यात आले होते.



या कार्यक्रमांमध्ये सहकार भारती नवी मुंबई अध्यक्ष प्रमोद जोशी, नवनीत प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष कडू, खजिनदार रश्मी सपकाळ, सहकार भारतीच्या महिला प्रकोष्ठ प्रमुख संगीता बांगर, महामंत्री संतोष मिसाळ, दीपा राऊत, विना मोकाशी यांनी आपल्या भाषणात महिलांना व्यवसाय वाढीबाबत मार्गदर्शन केले.

या वेळी नवी मुंबईतील सहकार भारती मधील महिलांच्या समाजपयोगी कामाची तसेच खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण होण्यासाठी सहकार भारती करत असलेल्या उपक्रमांची माहिती संगीता बांगर यांनी दिली तर प्राध्यापिका विना मोकाशी यांनी अखिल भारतीय स्तरावर महिला प्रकोष्ठ कशाप्रकारे कार्य करतो, महिला बचत गटाच्या माध्यमातून देशभरात चालत असलेल्या कार्याचा आढावा आपल्या भाषणात घेतला. सरकार महिलांसाठी राबवत असलेल्या अनेक कल्याणकारी योजनांची माहिती तसेच कोणत्याही सरकारी योजनेचा आपल्याला फायदा घ्यायचा असल्यास आपल्याकडे कोण कोणती कागदपत्रे असायला हवेत याची माहिती दीपा राऊत यांनी दिली.

या वेळी विविध क्षेत्रातून आलेल्या महिलांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला या कार्यक्रमांमध्ये शिक्षण, वैद्यकीय, व्यवसाय उद्योजिका, महिला बचत गट अशा अनेक प्रकारच्या क्षेत्रातून आलेल्या महिलांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षा जया आलिम चंदानी यांनी महिला बचत गटांच्या माध्यमातून नवी मुंबईमध्ये लवकरच उद्योग मेळावा घेणार असल्याचे सांगत महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नलिनी गावडे, श्रीकांत चव्हाण, उदय कुमार तांदळे, बसवराज दिघे, रामनाथ केदार, साक्षी वेखंडे नवनीत प्रतिष्ठानचे कार्यकर्ते त्याचप्रमाणे सहकार भारतीचा कार्यकर्त्यांचा सहभाग लाभला.

# गडकिल्ले आणि रांगोळी स्पर्धेचे बक्षीस वितरण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष शिरवणे-नेरूळ प्रभाग क्र २१ यांच्या वतीने माजी नगरसेविका माधुरी सुतार व समाजसेवक जयेंद्र सुतार यांच्या माध्यमातून दिवाळी उत्सवादरम्यान विविध सामाजिक उपक्रम झाले. यांचा बक्षीस समारंभ माजी खासदार संजीव नाईक आणि माजी महापौर जयवंत सुतार यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी पार पडला.



या वेळी भारतीय सण, उत्सव आणि परंपरा जपणेच्या अनुषंगाने कला प्रदर्शन व्यासपीठ स्पर्धेकांना उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यात गड किल्ले बांधणी व सेल्फी विथ रांगोळी स्पर्धाचा समावेश होता. या वेळी नवी मुंबई महानगरपालिका व ऑल इंडिया इन्स्टिट्यूटच्या संयुक्त विद्यमानाने प्रस्तुत ४० प्रकारच्या मोफत प्रशिक्षणामध्ये आरी वर्क (भरतकाम) या प्रशिक्षणाच्या नवीन दोन बॅचचे उद्घाटन आणि इतर प्रशिक्षणाच्या प्रशिक्षार्थी महिलांना प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.

या वेळी उत्कृष्ट रांगोळीकार विद्या दुर्गेश म्हात्रे (प्रथम) संवेदना हेमंत धुमाळ (द्वितीय) सविता सुनील जोशी यांनी त्रितीय तसेच गड किल्ले बांधणी स्पर्धात आदित्य पलई (प्रथम), पूर्वेश नाईक (द्वितीय) श्रीवरद विनायक-नेरूळचा विघ्नहर्ता (त्रितीय) यांना प्राप्त होऊन रोख पारितोषिके ३००१, द्वितीय रोख पारितोषिक २००१, व तृतीय पारितोषिक १००१ समवेत सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. तसेच स्पर्धेत सहभागी सर्वांना प्रोत्साहनात्मक बक्षिसे देण्यात आली.

या वेळी प्रभाकर ठाकूर, कुमुद पाटील, शोभा पाटील, पुष्पा गायकवाड, मीनाक्षी हिलाल, प्रतिभा विजय सुतार, वर्षा पवार, पुष्पा डोलकर, पुष्पा नांगरे, मीनाक्षी प्रतापसिंह, कविता पलाई, नम्रता तिवारी, संदीप पाटील, विशाल भोईर, दिलीप सुतार,हृत्विक जितेंद्र पाटील समवेत मोठ्या प्रमाणावर प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

# मोहोपाड्यात अत्याधुनिक डायग्नोस्टिक सेंटर सुरू




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा एमआयडीसी वसाहतजवळ एचडीएफसी बँकेसमोर लॅटीट्युड अपार्टमेंट इमारतीमध्ये निसर्ग डायग्नोस्टिक सेंटर या अत्याधुनिक रक्त तपासणी सेंटरचे उद्घाटन जिल्ह्यातील वारकरी सांप्रदायाच्या उपस्थितीत करण्यात आले. या सोहळ्याचे उद्घाटन गुरुवर्य ह.भ.प. रामदास (भाई) महाराज पाटील यांच्या हस्ते झाले.

या वेळी निसर्ग डायग्नोस्टिक सेंटरचे मालक हनुमंत लभडे व हर्षदा लभडे यांनी बोलताना सांगितले की, मोहोपाडा परिसरात अत्याधुनिक डायग्नोस्टीक सेंटर नसल्याने नागरीकांसह रुग्णांना पनवेल, नवी मुंबई येथे जावे लागते. मोहोपाडा शहरीकरणात होणारी वाढ पाहता मोहोपाडा येथे सर्व प्रकारच्या रक्ततपासणी अत्याधुनिक सुविधायुक्त डायग्नोस्टीक सेंटर सुरू झाल्याने रसायनीसह आसपासच्या परीसरातील नागरीकांना बाहेर जाण्याची गरज भासणार नाही.

या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर, सरपंच उमाताई मुंढे, माजी सरपंच संदिप मुंढे, माजी उपसरपंच सुरेश पाटील, माजी जि.प.सदस्या पदमा पाटील, दिपक कांबळी, हभप अनंत कार्ले महाराज, हभप विनायक महाराज कांबेकर, हभप काशिनाथ महाराज लभडे, हभप वामन महाराज भोईर, हभप महादेव महाराज मांडे, गोरक्षक बाळकृष्ण लभडे आदींसह मोठ्या संख्येने वारकरी सांप्रदाय उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेत मुक्ता खटावकर यांचा सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल सीबीएससी, उलवेच्या मुख्याध्यापिका मुक्ता भानुदास खटावकर यांनी श्रीलंकेमध्ये आयोजित इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन कॉलिटी एज्युकेशन २०२५ उवा प्रांत येथे २८ ते ३१ ऑक्टोबर रोजी स्कूल प्रतिनिधी म्हणून सहभाग नोंदविला.

या परिषदेमध्ये शैक्षणिक गुणवत्ता, पाठ्यक्रम विकास, विज्ञान व तंत्रज्ञान, शाळेचे विकसित नेतृत्व, आर्टिफिशियल इंटेलिजन्स वापरून शैक्षणिक अभ्यासक्रमात क्रांती घडविणे, आदी मुद्द्यावर चर्चा सत्र झाले. ज्यामध्ये सुमारे १२० मुख्याध्यापक उपस्थित होते. महाराष्ट्रातील १९ मुख्याध्यापकांना तेथे सहभागी होण्याची संधी मिळाली होती. ज्यामध्ये मुक्त खटावकर यांचा सहभाग होता. या वेळी त्यांनी TPCK (Technological Penological Content Knowledge) तांत्रिक शैक्षणिक सामग्री ज्ञान या विषयावर तेथील मुख्याध्यापकांना मार्गदर्शन-सादरीकरण केले.

या वेळी उवा प्रांताचे राज्यपाल जे.एम. कपिला जयसेखरा यांच्यामार्फत चीफ सेक्रेटरी ऑफ उवा प्रांत यांच्या हस्ते त्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# उरण ओएनजीसी प्लांटतर्फे शालोपयोगी वस्तूंचे वाटप

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेचे द्रोणागिरी हायस्कूल करंजा मराठी व सेमी इंग्रजी माध्यम या विद्यालयात ओएनजीसी प्लांट उरण यांच्या सीएसआर फंडातून विद्यार्थ्यांना स्कूल बॅग आय कार्ड रेनकोट स्कूल युनिफॉर्म स्पोर्ट युनिफॉर्म शूज तसेच विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण योग्यरित्या घेता यावे यासाठी दहा संगणक सेट इन्व्हर्टर एसी इत्यादी साहित्य देण्यात आले.



या वेळी ओएनजीसी प्लांट तर्फे भावना आठवले, संजीव मोहन अभिषेक पाटील, फाउंडेशन तर्फे वामन कांबळे, वंदना मॅडम, किशोर गमरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या वेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका म्हात्रे सुरेखा चंद्रशेखर यांनी प्रास्ताविक केले. नंतर भावना आठवले मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सिताराम नाखवा ज्येष्ठ सदस्य यांनी विद्यालयाची माहिती सांगितली तसेच ओएनजीसीचे सीजीएम सपोर्ट मॅनेजर संजीव मोहन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नंतर अभिजीत पाटील सरांनी मार्गदर्शन केले आणि साद फाउंडेशनचे संस्थापक वामन कांबळे यांनीसुद्धा विद्यार्थ्यांना प्रकल्पाबद्दल माहिती सांगितली.

विद्यार्थ्यांना विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध झाल्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगती उत्तमरीत्या होऊ शकते यासाठी विद्यालयातील कुमारी हेतल पांचाळ व तनिष्का पाटील यांनी आपल्या मनोगतातून ओएनजीसी प्लांट उरण चे सर्व अधिकारी पदाधिकारी तसेच साद फाउंडेशनचे अधिकारी पदाधिकारी यांचे आभार व्यक्त केले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानून अध्यक्षांच्या वतीने कार्यक्रम संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

# खालापूर नगरपंचायत वाढीव घरपट्टीविरोधात नागरिक आक्रमक

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

नगरपंचायत खालापूर हद्दीत नागरिकांना मुलभूत सोयी सुविधांची वानवा असताना जुलमी करवाढीचा प्रस्ताव आणल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. रविवारी हनुमान मंदिरात झालेल्या बैठकीत मुख्याधिकारी यांना जाब विचारण्यासाठी नगरपंचायतीवर धडक देण्याचा निर्धार नागरिकांनी उचलला आहे.

नगरपंचायतीने घरपट्टी करामध्ये मोठी वाढ केली असून सध्याच्या घरपट्टी पाच पट वाढ होणार असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नगरपंचायतीची मालमत्ता करातील प्रस्तावित करवाढ विरोधात नगरपंचायत खालापूर हद्दीतील नागरिकांनी १३ डिसेंबर २०२४ रोजी ठिय्या आंदोलन केले होते, परंतु त्यानंतरदेखील जाग न आलेल्या नगरपंचायत प्रशासनाने पुन्हा कर वाढीच्या नोटीस पाठवल्या आहेत. पूर्वीची वार्षिक घरपट्टी कर ५०६ रुपये इतका होता, मात्र सध्या नगरपंचायतीने दिलेल्या नोटीसीनुसार कर रक्कमभरमसाठ वाढवण्यात आला आहे. ही रक्कम एकाच वर्षाची आहे की चार वर्षांची, हे स्पष्टपणे नमूद केलेले नाही, त्यामुळे नागरिकांमध्ये मोठी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा कितीतरी



चुका असल्याचे ज्येष्ठ नागरिक नवीन दादा घाटवळ व ॲड. राकेश गव्हाणकर यांनी सांगितले.

खालापूर शहरात सुविधांचा वानवा असून पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटणार कधी असा नागरिक सवाल करत आहेत. हॉटेल व पेट्रोलपंप व्यावसायिक यांना मात्र नियमित पाणी मिळत असल्याने येणारा लाईट बिल नागरिकांच्या करातून न भरता हॉटेल व पेट्रोल पंप व्यावसायिक यांच्याकडून भरून घ्यावा अन्यथा त्यांचा पाणीपुरवठा बंद करण्यात यावा, अशी मागणी या वेळी नागरिकांनी केली. मालमत्ता कर आकारणी संदर्भात जो सर्वे करण्यात आला होता तो शाळकरी विद्यार्थी यांच्याकडून करण्यात आला होता तो पुन्हा नव्याने सर्वे करण्यात यावा अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

या वेळी सभापती किशोर पवार, नगरसेविका सुप्रिया साळुंखे, माजी नगरसेवक अवधूत भुर्के, ज्येष्ठ नागरिक नवीनदादा घाटवळ, राकेश गव्हाणकर, मनोज पारठे पोलीस पाटील, रमेश शहा, जनार्दन लवाटे, संगीता घाटवळ, संस्कृती खडकबाण, प्रकाश जंगम, येवला आण्णा, नितीन पाटील, उमेश पडवकर, गुंड्या गोडसे, पाष्टे काका, नितिन खराळ, सचिन महागावकर, दिलीप पवार, हनुमंत पारठे, विजय भोसले, मंगेश घैसास, किरण बेलखडे, संतोष जगताप, महेश मानकामे, अक्षय भोसले, रोहित कीरकिंडे, सुधीर जोशी, मिलिंद चाळके, सुमित वाघरे, नितीन बोंदार्डे, तुकाराम घोलप, सारंग भोसले, जिग्नेश शहा आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

एका नागरिकाचे महड येथे स्लॅबचे घर दाखवण्यात येऊन नोटिस पाठवण्यात आली आहे, परंतु या व्यक्तीची कोणतीही मालमत्ता नाही. शिवाय घरपट्टीचे पैसे हडप करणारे नगरपंचायत कर्मचारी गुन्हा दाखल होवूनदेखील जबाबदारीची कामे नगरपंचायत कार्यालयात करत आहेत.

**चर्चेसाठी वेळेची मागणी**

घरपट्टी कराच्या वाढीबाबत आक्षेप नोंदविण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर असल्यामुळे नागरिकांनी एकजूट करून करवाढ प्रस्ताव हाणून पाडण्याचा निर्णय घेतला आहे. सामूहिकरीत्या लेखी आक्षेप सादर करणार असून ६ नोव्हेंबर रोजी नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा करण्यासाठी वेळ मागण्यात येणार आहे.

# लोणेरे येथील विस्तारित कुणबी भवनासाठी २५ लाख मंजूर

## विकासकामांना गती देण्याची खासदार सुनील तटकरेंची ग्वाही




**माणगाव : प्रतिनिधी**

माझे उत्तरदायित्व आणि सामाजिक बांधिलकी विकासकामांशी, समाजकल्याणाशी आणि जनतेच्या हिताशी घट्ट जोडलेले आहे, असे सांगत खासदार सुनील तटकरे यांनी विकास कामांना गती देण्याची ग्वाही दिली. या कार्यक्रमात खासदार तटकरे यांनी खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या निधीतून लोणेरे येथील विस्तारित कुणबी भवन इमारतीसाठी २५ लाख रुपये मंजूर झाल्याचे पत्र कुणबी समाज मंडळ बावीसी तळेगाव व लोणेरे विभागाचे पदाधिकारी आणि उपसरपंच अशोक पाटील यांच्या हाती सुपूर्द केले. यापूर्वीही त्यांनी या भवनाच्या बांधकामासाठी १० लाखांची मदत दिली होती. आता विस्तारित इमारतीसाठी मिळालेल्या निधीमुळे कामाला गती मिळणार असून समाजबांधवांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

खासदार तटकरे यांनी सांगितले की, निजामपूर, गांगवली, पळसगाव, लोणेरे, गोरेगाव आणि माणगाव परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. दिलेली प्रत्येक आश्वासने पाळली आहेत.

जांभूळवाडी-पळसगाव आणि आम्रेवाडी-घरोशीवाडी हे सहा कोटींचे दोन रस्ते पंतप्रधान ग्रामसडक योजना आणि मुख्यमंत्री सडक योजनेतून तातडीने पूर्ण करण्याचे त्यांनी आश्वासन दिले. तसेच जलसंधारण विभागातील बंधाऱ्याचे काम, पाणीपुरवठा योजना आणि स्थानिक शाळांसाठी अधिक निधी उपलब्ध करून देण्याचेही त्यांनी स्पष्ट केले.


पालकमंत्री असताना या मतदारसंघात अनेक कामे मी केली आहेत आणि पुढेही जनतेच्या हितासाठी प्रयत्न करत राहीन, असे तटकरे म्हणाले. या सभेत उपसरपंच अशोक पाटील यांनी शिवसेनेतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या घोषणेनंतर अनेक सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व कार्यकर्ते राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते ॲड. राजीव साबळे यांनी सांगितले.

# अलिबाग-रोहा राज्य महामार्ग लवकर बनण्याची मागणी

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग-रोहा रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. १७७ कोटी रुपयांचा खर्च असलेल्या या रस्त्याचे काम रखडले आहे. रामराज ते सुडकोलीदरम्यानचे पाच पूल धोकादायक अवस्थेत असल्यामुळे जिल्हा प्रशासनाने अलिबाग-रोहा मार्गावर अवजड वाहनांना प्रवेशबंदी केली आहे. त्यामुळे या मार्गावरील एसटी सेवा तीन महिन्यांपासून बंद आहे.

अलिबाग-रोहा या रस्त्याच्या कामासाठी १७७ कोटी रुपये निधी मंजूर झाला. हॅम अंतर्गत मंजूर झालेल्या अलिबाग-रोहा रस्त्याचे काम गुजरातमधील मेसर्स जेआरए अलिबाग रस्ता प्रकल्प प्रा. लि. या ठेकेदार एजन्सीला देण्यात



आले. या कामांतर्गत अलिबाग रोहा-साई हा ८५ किलोमीटरचा दुपदरी मार्ग करण्यात येणार आहे. औद्योगिकीकरणाला चालना देणाऱ्या या मार्गाची कनेक्टिव्हिटी पुढे दिघी पोर्टपर्यंत असणार आहे, मात्र या महामार्गाच्या कामासाठी आणखी पैसे लागणार असल्याने ठेकेदाराने रस्त्याचे काम बंद केले आहे.

**वाहतूक बंद असलेल्या पुलांची नावे**

१. रामराज पूल, किमी (२०/३४०); २. स्लॅब कलवर्ट, किमी (२१/६८०); ३. स्लॅब कलवर्ट, किमी (२२/२५०); ४. सुडकोली पुल, किमी (२६/२६०); ५. सुडकोली पुल, किमी (२६/५४०).

# जीवना कोळीवाड्यात विविध कामांचे भूमिपूजन

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

जीवना कोळीवाडा परिसरात आज विकासाचा नवा अध्याय सुरू झाला. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते ‘दिनेश पेरेकर घरापासून दामोदर पाटील घरापर्यंतच्या रस्ता व गटारलाईन कामाचे भूमिपूजन’ उत्साहात पार पडले. या प्रकल्पामुळे परिसरातील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध होऊन वाहतुकीसह स्वच्छतेत मोठी सुधारणा होणार आहे.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, जीवना कोळीवाडा आणि श्रीवर्धन परिसराचा सर्वांगीण विकास आमचे ध्येय आहे. या कामांमुळे किनाऱ्याचे संरक्षण, पर्यटनवृद्धी आणि नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडणार आहेत.



विकास करताना पर्यावरण आणि स्थानिक संस्कृतीचा सन्मान राखणे हेच आमचे प्राधान्य आहे. यानंतर श्रीवर्धन शहर व परिसरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन मंत्री तटकरे यांच्या हस्ते पार पडले.

यामध्ये दांडा समुद्रकिनारी धूपप्रतिबंधक बंधारा व किनारा शुशोभीकरण प्रकल्प, समुद्रकिनारा वनपर्यटन प्रकल्प, जिवनेश्वर मंदिर ते जीवना मंदिर रस्ता डांबरीकरण, नारायण पाखाडी उत्तर विभाग रस्ता सुधारणा तसेच धोंडगल्ली व्यायामशाळा उभारणी आदी महत्त्वाच्या कामांचा समावेश होता. विशेष म्हणजे, दांडा किनाऱ्यावरील धूपप्रतिबंधक बंधारा ‘नायरा एनर्जी’ कंपनीच्या CSR निधीतून उभारला जात आहे. या उपक्रमामुळे किनाऱ्याचे संरक्षण, मच्छीमार वस्त्यांचे रक्षण, स्थानिक भूभागाची सुरक्षितता आणि पर्यटन विकासाला चालना मिळणार आहे.

शुशोभीकरण व वनपर्यटन प्रकल्पामुळे श्रीवर्धन किनाऱ्याला नवी ओळख मिळणार असून, पर्यावरण पर्यटनाला चालना मिळेल. निसर्गाच्या सान्निध्यात स्वच्छ, शांत आणि प्रदूषणमुक्त वातावरण अनुभवण्याची नवी संधी पर्यटकांना उपलब्ध होईल. यामुळे वनसंपदेचे संवर्धन व किनारपट्टीचे पर्यावरणीय संतुलन टिकून राहणार आहे.

शहरातील रस्त्यांचे डांबरीकरण पूर्ण झाल्यानंतर वाहतूक सुलभ होईल आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अडथळे दूर होतील, तर धोंडगल्ली व्यायामशाळेमुळे स्थानिक युवक व खेळाडूंना प्रशिक्षण व आरोग्यवर्धक सुविधा उपलब्ध होतील.

या कार्यक्रमावेळी शहराध्यक्ष जितेंद्र सातनाक, महिला शहराध्यक्षा राजसी मुरकर, प्रविता माने, कविता सातनाक, अनंत गुरव, बाळकृष्ण गोरनाक, तसेच अखंड जीवना कोळी समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध खात्यांचे अधिकारी आणि मान्यवर उपस्थित राहून प्रकल्पांविषयी समाधान व्यक्त केले.

# कोकण रेल्वे जंक्शनसाठी संभाजी ब्रिगेडचा पाठिंबा

**माणगाव : बातमीदार**

महाड शहराजवळ कोकण रेल्वे जंक्शन व्हावे यासाठी महाड शहरामधील रहिवाशी पराग वोडके हे छत्रपती शिवाजी महाराज चौक, महाड या ठिकाणी आमरण उपोषण करत



आहेत. सुरू झालेल्या या उपोषणाकडे प्रशासनामार्फत अजूनही कोणताही सकारात्मकपणे तोडगा काढण्यात आलेला नाही.

महाड तसेच पोलादपूर रहिवाशांसाठी महत्त्वाचा विषय असलेल्या या रेल्वे जंक्शन तथा रेल्वे स्थानकासाठी आपला जाहीर पाठिंबा देण्यासाठी संभाजी ब्रिगेडचे रायगड जिल्हाध्यक्ष-शिवश्री वैभव हरिश्चंद्र सुर्वे, महाड तालुकाध्यक्ष-शिवश्री कैलास अटक, महाड तालुका उपाध्यक्ष-शिवश्री सुजित सुतार, महाड तालुका सचिव शिवश्री निकेश पवार उपस्थित होते. या वेळी रायगड जिल्हाध्यक्ष शिवश्री वैभव सुर्वे यांनी महाड जवळ कोकण रेल्वेचे जंक्शन होण्यासाठी संभाजी ब्रिगेड रायगड तर्फे जाहीर पाठिंबा दिला आहे.

# प्रख्यात हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अनुज साठे महिन्याच्या पहिल्या रविवारी नागोठण्यात

**नागोठणे : बातमीदार**

कळंबोली (पनवेल) येथील व्हाईट लोटस इंटरनॅशनल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथील १५ वर्ष अनुभव असलेले प्रख्यात हृदयरोगतज्ज्ञ (डायरेक्टर कार्डीयॉलॉजि डिपार्टमेंट) डॉ. अनुज साठे व १२ वर्ष अनुभव असलेले सिनियर न्यूरोसर्जन डॉ. अमोल सुडके हे नागोठणे बाजारपेठमधील गिरीराज हेल्थकेअर मल्टी स्पेशलिटी पॉलीक्लिनिकमधील गोरगरीब गरजवंत रुग्णांना मोफत किंवा अत्यंल्प दरात सेवा देण्याकरीता प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत उपलब्ध राहणार




असल्याची माहिती गिरीराज हेल्थकेअर मल्टी स्पेशालिटी पॉलीक्लिनिकचे संचालक मनोज जैन व प्रवीण जैन यांनी दिली.

दरम्यान डॉ. अनुज साठे व डॉ. अमोल सुडके हे नागोठण्यात येणार असल्यामुळे नागोठणेकरांना चांगलाच दिलासा मिळाला आहे. रविवार, २ नोव्हेंबर रोजी डॉ. अनुज साठे व डॉ. अमोल सुडके हे नागोठणे येथे आले त्यावेळी त्यांचे राष्ट्रवादीचे नेते नरेंद्र जैन, भाईसाहेब टके यांनी स्वागत केले.

या वेळी व्हाईट लोटस हॉस्पिटलचे जनरल मॅनेजर गणेश राणे, मार्केटिंग मॅनेजर विदयेशी राऊत, प्रकाश जैन, अनिल काळे, दिलीप शहासने, हभप विजय महाराज शहासने, चेतन टके,श्रीपाल जैन, जितेंद्र जाधव, मनोहरलाल मेहता, संतोष जैन, मनोज जैन, प्रविण जैन, सागर जैन, अझीम मुल्ला, संजय दोषी, प्रणित पाटील, प्रकाश चंदने, भावेश बाफना, अब्दुल दफेदार आदी उपस्थित होते.

व्हाईट लोटस इंटरनॅशनल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर मध्ये नागोठण्यातील रुग्णांना कोणत्याही प्रकारची मेडिकल सेवा, कोणताही वैद्यकीय उपचार, शस्त्रक्रिया कमी दरांमध्ये होण्यासाठी आम्ही पूर्णतः सहकार्य करु असे डॉ. अनुज साठे, डॉ. अमोल सूडके, व्हाईट लोटस हॉस्पिटलचे जनरल मॅनेजर गणेश राणे, मार्केटिंग मॅनेजर विदयेशी राऊत यांनी या वेळी आश्वासित केले.

# दिवसा ऊन, सायंकाळी पाऊस

## बदलत्या हवामानामुळे नागरिक हैराण

**रोहा : प्रतिनिधी**

नोव्हेंबरलाही पावसाने हजेरी लावायचे सातत्यपणा चालू ठेवला आहे. शनिवारी दिवसभर ऊन पाऊस असे चित्र असताना रविवारी सायंकाळी मात्र पावसाने पुन्हा एकदा हजेरी लावली आहे.

सायंकाळी काळखमय वातावरण करीत पावसाने पाच नंतर रोहा शहराचा तालुक्यातील ग्रामीण भागात हजेरी लावली आहे. चांगला पाऊस रविवारी सायंकाळी पडला आहे. यावर्षी मे मध्ये पावसाने सुरुवात केल्यानंतर अद्याप थांबण्याचे नावच घेत नसल्याचे दिसून येत आहे. ऑक्टोबर महिना हा उष्णतेचा समजला जातो. परंतु यावर्षी ऑक्टोबर हिट गायबच झाले असून थंडीचे वातावरण येईल असे चित्र असताना थंडीचे अद्याप चाहुल नसल्याचे दिसून येते. मे मध्ये पावसाने हजेरी लावल्यानंतर नोव्हेंबर चा महिना उजाडला तरी पाऊस थांबायचं नावच घेत नाही.

पावसामुळे शेतकऱ्यांसह सगळे चिंताग्रस्त आहेत.तब्बल सहा महिने झाले असले तरी पाऊस थांबण्याचे नावच घेत नसल्याचे दिसून येते.

रविवारी सायंकाळी काळोखमय वातावरण करून पाऊस पडला आहे. वातावरणात गारवा पावसामुळे निर्माण झाला आहे. संपूर्ण वातावरण पाऊस नाही झाल्याचे दिसून आले.

# कार्तिकी एकादशीनिमित्त पोलादपूरमध्ये महिलांची प्रभातवारी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

आदिशक्ती भजन मंडळ, दशानेमा गुजराती महिला मंडळ, दिशा सांस्कृतिक ग्रुप तसेच अन्य हिंदूधर्मिय महिलांनी कार्तिकी एकादशीनिमित्त रविवारी सकाळी काकडआरतीनंतर अभंग आणि विठ्ठलनामाचा गजर करीत पायी प्रभातवारी काढली.

कार्तिक महिन्याच्या पहिल्या दिवसापासून काकड आरती करून देवांना जागे करण्याची प्रथा पोलादपूर शहरात काही महिलांनी अद्याप सुरू ठेवली



असून काकड आरतीसाठी दिवाळी पाडव्याला सर्व महिलावर्ग सज्ज होत असतात. श्री सदगुरू राममंगलदास मंदिराकडे सर्व महिलावर्गाने हातीमस्तकी तुळशीचे रोपटे घेऊन विठ्ठलनामाचा गजर करीत पहाटेच पायीवारी काढली.

या पायीवारीमध्ये अश्विनी गांधी, प्रिती बुटाला, ज्योत्ना केसरकर, शिल्पा शिंदे, कांचन बुटाला, अश्विनी तलाठी, पालांडेवहिनी, उज्ज्वला शेठ, कलिका अधिकारी, माई शेठ, शर्मिला बुटाला, स्वाती तलाठी, अश्विनी तलाठी, नीला तलाठी, स्वरूपा तलाठी, सरिता शेठ, कांचन तलाठी, पुष्पा पाटोळे, जोशी वहिनी, श्रावणी शहा, निकिता शेठ, निमा शेठ, लतिका कापडेकर, वैशाली भूतकर, केतकी शेठ, प्रज्ञा शेठ, अस्मिता तलाठी, लता जंगम, वैशाली पांढरकामे, निलीमा सुतार, मालती मधुकर शेठ तसेच असंख्य महिला सहभागी झाल्या.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ५८/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | तळोजा औद्योगिक क्षेत्र.... तळोजा सांडपाणी निःसारण योजना टप्पा क्र.१ येथील सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील नव्याने बांधलेल्या १५०० घनमीटर स्टोरेज कम कलेक्शन संप करीता पंपिंग मशिनरी व संबंधित उपकरणांचा पुरवठा करून, उभारणी करणे, चाचणी घेऊन कार्यान्वित करणे. | ₹ ४,४२,४६,४०७.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०४/११/२०२५ ते दिनांक १९/११/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १०/११/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १३/११/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# भारतीय महिलांनी रचला नवा इतिहास!

## विश्वविजयाने क्रिकेट प्रवासात सुवर्ण अध्याय जोडला

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शफाली, स्मृती मानधनाचा फलंदाजीतील झंझावात आणि दीप्ती शर्माच्या अष्टपैलू खेळाच्या बळावर भारतीय महिला क्रिकेट संघाने आयसीसी वनडे विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम लढतीत दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव केला आणि पहिल्यावहिल्या जेतेपदाचा आनंद अगदी दूरदूरपर्यंत दुमदुमला. या जेतेपदाने देशाच्या क्रीडा यशाच्या इतिहासात खऱ्या अर्थाने एक सुवर्ण अध्याय जोडला आहे.



गेल्या आठवड्यापर्यंत राखीव खेळाडूंमध्येही स्थान नसलेल्या २१ वर्षीय शफाली वर्माने भारताच्या ७ बाद २९८ धावसंख्येत ८७ धावांची अविस्मरणीय खेळी केली. त्यानंतर तिने दोन महत्त्वपूर्ण बळी घेत दक्षिण आफ्रिकन महिला संघाला मोक्याच्या क्षणी पिछाडीवर टाकले. खचाखच भरलेल्या डी. वाय. पाटील स्टेडियमवरील या लढतीत भारताने दक्षिण आफ्रिकेला सर्वबाद २४६ धावांवर रोखत ऐतिहासिक विजयावर शिक्कामोर्तब केले. अनुभवी दीप्ती शर्मा (५/३९) आणि युवा श्री चरणी (१/४८) यांनीही प्रचंड दबावाखाली आपली भूमिका चोख बजावत हा अविस्मरणीय दिवस साकारण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी २९९ धावांचे तगडे आव्हान असताना कर्णधार लॉरा वोल्डार्टने तडफदार शतक फटकावत जोरदार झुंज दिली. तिला नरी डर्कसनने चांगली साथ दिली. या दोघींची जोडी जमली असताना डावाच्या ३९.३व्या षटकात दीप्तीने उत्कृष्ट यॉर्कर टाकून घातक ठरू पाहणारी डर्कसनला त्रिफळाचीत केले. दीप्तीचा हा अचूक यॉर्कर चेंडू ब्लॉकहोलमध्ये पडला. फटका मारण्यासाठी डर्कसनची बॅट खाली येण्यास उशीर झाला आणि चेंडूने थेट यष्ट्यांचा वेध घेतला. ३७ चेंडूंमध्ये एक चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ३५ धावांची उपयुक्त खेळी करणारी डर्कसन बाद झाली. दीप्ती शर्माने या स्पर्धेत या 'डेथ ओव्हर' डिलिव्हरीचा प्रभावीपणे वापर करत अनेक विकेट्स घेतल्या आहेत आणि या वेळीही भारताला निर्णायक क्षणी यश मिळवून दिले.

यानंतर दीप्ती शर्माच्या ४२व्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर लॉराचा अंदाज चुकला व येथेच या सामन्याला मोठी कलाटणी मिळाली. अमनज्योतच्या हातातून झेल दोनवेळा निसटत होता, त्यावेळी अवघ्या देशवासीयांच्या काळजाचे ठोके क्षणभर चुकलेच होते, पण सुदैवाने तिसऱ्या प्रयत्नात तिने अखेर यशस्वी झेल पूर्ण केला आणि भारताच्या मार्गातील सर्वात मोठा अडसर दूर झाला. मग उरलेल्या फलंदाजांना बाद करीत भारताने औपचारिकता पूर्ण केली.

भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत सात गडी गमावून २९८ धावांची मोठी धावसंख्या उभारली होती. नवी मुंबईत झालेल्या या सामन्यात भारताकडून शेफाली वर्माने सर्वाधिक ८७ धावांची, तर दीप्ती शर्माने ५८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली.

## आयएचपीएलचा प्रयोग फसला

**श्रीनगर : वृत्तसंस्था**

अनेक देशी, विदेशी क्रिकेटपटूंना खेळण्यासाठी बोलावून, एखाद्या बड्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट लीगसारखी हवा करून काश्मीरमध्ये सुरू झालेली इंडियन हेवन प्रीमियर लीग सध्या वादात सापडली आहे. या स्पर्धेचे आयोजन अचानक गायब झाल्याने स्पर्धेत सहभागी झालेले क्रिकेटपटू आणि पंचांवर मोठी नामुष्की ओढवली आहेत.

आयोजकांनी खेळाडू आणि पंचांचे मानधन तसेच हॉटेलचे बिल दिले नसल्याचे समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे हॉटेलचे बिल न भरले गेल्याने हॉटेल व्यवस्थापनाने खेळाडूंना हॉटेलबाहेर येण्यापासून रोखल्याचीही माहिती समोर येत आहे. या लीगमध्ये आठ संघ आणि ७० खेळाडू सहभागी झाले होते, मात्र तत्पूर्वीच आयोजक फरार झाल्याने खळबळ उडाली आहे.

## स्मृती मानधनाने मिताली राजला टाकले मागे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघाची स्टार सलामी फलंदाज स्मृती मानधनाने महिला वनडे विश्वचषक स्पर्धेत पराक्रम केला आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात तिने आपल्या खेळीतील २१ धावा पूर्ण करताच भारताची माजी कर्णधार मिताली राजला मागे टाकले.

महिला विश्वचषक अंतिम सामन्यात स्मृती मानधनाने ४५ धावा केल्या आणि महिला विश्वचषकाच्या एकाच आवृत्तीत भारतासाठी सर्वाधिक धावा करणारी फलंदाज ठरली. तिने २०१७च्या विश्वचषकात ४०९ धावा काढणाऱ्या माजी कर्णधार मिताली राजला मागे टाकले. मानधनाने यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत ४३४ धावा केल्या, ज्यात दोन अर्धशतके आणि एक शतकाचा समावेश आहे.



### लॉराचा नवा विश्वविक्रम

*जागतिक विक्रमाबद्दल बोलायचे झाले, तर एका वर्ल्डकपच्या आवृत्तीत सर्वाधिक धावा करण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिली हिच्या नावावर होता. तिने २०२२च्या हंगामात ५०९ धावा केल्या आहेत. यंदाच्या हंगामातील फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्वाड्र्ट हिने ४० धावा करताच हा निधी मोडित काढला. तिने शतकी खेळीसह एकूण वर्ल्डकपमध्ये ५३० धावा केल्या.*

## हरमनप्रीत कौरने मोडला बेलिंडा क्लार्कचा विक्रम



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामन्यात भारत आणि दक्षिण आफ्रिका आमने-सामने आले, ज्यात यजमान संघाने बाजी मारली. या सामन्यात भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने १६६ धावांवर दोन विकेट गमावल्यानंतर हरमनप्रीत कौर फलंदाजीला आली. तिच्याकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती, परंतु ती २९ चेंडूत केवळ २० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. या छोट्या खेळीसह हरमनप्रीतने एका मोठ्या विश्वविक्रमावर नाव कोरले. ती आता आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या इतिहासात नॉकआउट सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा करणारी खेळाडू बनली आहे. या विक्रमासह हरमनप्रीतने माजी ऑस्ट्रेलियन कर्णधार बेलिंडा क्लार्क हिला मागे टाकले आहे. बेलिंडाने सहा डावांमध्ये ३३० धावा केल्या होत्या, तर हरमनप्रीतने केवळ चार डावांमध्येच ३३१ धावा करण्याचा पराक्रम केला.

कर्णधार हरमनप्रीत कौरने मोठा विक्रम आपल्या नावावर नोंदवला असला तरी तिची या विश्वचषकातील फलंदाजीची एकूण कामगिरी अपेक्षेनुसार झाली नाही.

# शफालीने अखेर संधीचे सोने केले!

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताची सलामीची युवा बॅटर शफाली वर्माने नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर रंगलेल्या फायनलमध्ये विक्रमी खेळी केली. प्रतीका रावलच्या दुखापतीमुळे वर्षभरानंतर टीम इंडिया वाइल्ड कार्ड एन्ट्री मिळालेल्या शफालीने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या विश्वचषक स्पर्धेतील अंतिम सामन्यात जबरदस्त खेळीसह लक्ष वेधून घेतले.

शफालीला या सामन्यात भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी आणि टीम इंडियाचा विद्यमान प्रशिक्षक आणि माजी क्रिकेटर गंभीर यांना मागे टाकण्याचा डाव साधण्याची मोठी संधी होती, पण अवघ्या १३ धावांनी तिचे शतक हुकले अन् ही संधी दवडली गेली. असे असले तरी ७८ चेंडूत ८७ धावांची उपयुक्त खेळी करत तिने खास विक्रमाला गवसणी घातली आहे. महिला विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताकडून सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम तिच्या नावे झाला आहे. तिने माजी महिला क्रिकेटपटू पूनम राऊतचा विक्रम मोडीत काढला. पूनमने २०१७च्या विश्वचषकातील अंतिम सामन्यात इंग्लंडविरुद्धच्या लंडनमधील



लॉर्ड्सच्या मैदानात ८६ धावांची खेळी केली होती.

आयसीसीच्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील अंतिम सामन्यात आतापर्यंत एकाही भारतीयाने शतक झळकावलेले नाही. २०११च्या पुरुष विश्वचषक स्पर्धेत गौतम गंभीरचे शतक अवघ्या तीन धावांनी हुकले होते. मुंबईच्या वानखेडेच्या मैदानात खेळवण्यात आलेल्या श्रीलंकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात गंभीरने ९७ धावांची खेळी केली होती. याच सामन्यात महेंद्रसिंह धोनीने ९१ धावांची नाबाद खेळी केली होती. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या फायनलमधील ८७ धावांच्या खेळीसह शफाली या यादीत तिसऱ्या, तर पूनम राऊत ८६ धावांच्या खेळीसह चौथ्या क्रमांकावर आहे. याशिवाय गोलंदाजी करताना शफालीने दोन विकेट्स घेत अष्टपैलू कामगिरी बजावली.

### वडिलांना दिलेला शब्द पाळला

टीम इंडियाची युवा सलामीवीर शेफाली वर्माने आपल्या वडिलांना दिलेला शब्द पाळत आयसीसी महिला विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात उत्कृष्ट अर्धशतक झळकावले. विश्वचषक संघात निवड न झालेल्या शेफालीला प्रतीका रावलच्या दुखापतीमुळे उपांत्य फेरीच्या सामन्यापूर्वी अचानक संघात स्थान मिळाले होते. उपांत्य फेरीत अपयशी ठरल्यानंतर तिने वडिलांशी एक खास वायदा केला होता आणि रविवारी खेळण्यात आलेल्या द. आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात २१ वर्षीय या आक्रमक फलंदाजाने स्मरणीय अर्धशतक झळकावत दमदार पुनरागमन केले. यासोबतच विश्वचषक फायनलमध्ये अर्धशतक झळकावणारी ती सर्वात कमी वयाची फलंदाज ठरली आहे.

## स्मृती मानधनाचे होणाऱ्या पतीबरोबर मैदानावर सेलिब्रेशन

**मुंबई** : भारताच्या लेकींनी महिला विश्वचषक २०२५च्या ट्रॉफीवर आपले नाव कोरले आणि देशभरात सगळीकडे याचा जल्लोष केला जात आहे. दरम्यान, स्मृती मानधनाने तिचा बॉयफ्रेंड पलाश मुच्छलसह मैदानावर या विजयाचा आनंद साजरा केला.



स्मृती मानधना भारताच्या विजयाच्या आनंद साजरा करत होती. यादरम्यानच प्रियकर आणि चित्रपट निर्माता-संगीत दिग्दर्शक पलाश मुच्छलला ती भेटण्यासाठी गेली. पलाशने तिला मिठी मारत तिचे कौतुक केले. यानंतर पलाशने त्याच्या खांद्यावर असलेला भारताचा झेंडा स्मृतीच्या खांद्यावर ठेवला. हे प्रेम पाहून सर्वच जण त्याचे कौतुक करत आहे. याचाव्हिडीओ आयसीसीनेही शेअर केला आहे.

स्मृती आणि पलाश याच महिन्यात म्हणजेच नोव्हेंबर २०२५मध्ये लग्नबंधनात अडकणार असल्याचे काही रिपोर्टमध्ये समोर आले आहे. नुकतेच पलाशने त्यांचे नाते जगजाहीर केले होते.

## १९८३चा क्षण महिला संघाने जिवंत केला!

### सचिन तेंडुलकरकडून टीम इंडियाचे विशेष कौतुक



**मुंबई : प्रतिनिधी**

आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत प्रथमच विश्वविजेतेपदावर आपले नाव कोरले. भारतीय महिला क्रिकेट संघाच्या या ऐतिहासिक कामगिरीनंतर क्रिकेट विश्वातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. अनेक दिग्गज क्रिकेटपटूंनी भारतीय महिला संघाला शुभेच्छा दिल्या आहेत. क्रिकेटचा देव म्हटल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकरनेही आपला आनंद व्यक्त करताना, या विजयाची तुलना १९८३च्या विश्वचषकाशी केली.

१९८३च्या विश्वचषकाने एका संपूर्ण पिढीला मोठी स्वप्ने पहायला आणि ती साकार करायला प्रेरित केले. आज आपल्या महिला संघाने खऱ्या अर्थाने काहीतरी खास केले आहे. त्यांनी देशातील असंख्य युवा मुलींना बॅट आणि बॉल उचलून मैदानात उतरण्याची आणि एक दिवस आपणही ट्रॉफी उचलू शकतो, हा विश्वास ठेवण्याची प्रेरणा दिली आहे. हा भारतीय महिला क्रिकेटच्या प्रवासातील निर्णायक क्षण आहे, असे सचिन तेंडुलकरने म्हटले.

विराट कोहलीनेही आपला आनंद व्यक्त केला. या मुलींनी इतिहास रचला आहे आणि एक भारतीय म्हणून मला खूप अभिमान वाटतोय. इतक्या वर्षांची मेहनत आज फळाला आली. हरमनप्रीत आणि संपूर्ण टीमचे ऐतिहासिक कामगिरीबद्दल खूप अभिनंदन. हा क्षण आपल्या देशातील असंख्य मुलींना खेळ स्वीकारण्याची प्रेरणा देईल. जय हिंद!, असे विराटने म्हटले.

## ऑस्ट्रेलियन संघातून ट्रॅव्हिस हेडसह तीन खेळाडू बाहेर

**सिडनी : वृत्तसंस्था**

भारताने रविवारी झालेल्या टी-२० मालिकेतील तिसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा पराभव करत मालिका १-१ अशी बरोबरीत आणली. या सामन्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या चमूतून तीन खेळाडूंना रिलिज करण्यात आले आहे.

अॅशेस मालिकेच्या तयारीसाठी ट्रॅव्हिस हेड आणि सीन बॉट यांना टी-२० संघातून मुक्त करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त तनवीर संघा याला वनडे कप सामन्यात खेळण्यासाठी सोडण्यात आले आहे. दुखापतीतून सावरलेला बेन ड्वारशुइस संघात परतला आहे.

इंग्लंडविरुद्धच्या बहुप्रतिक्षित अॅशेस मालिकेच्या तयारीला ऑस्ट्रेलियाने सुरुवात केली आहे. यासाठी ट्रॅव्हिस हेड आता शेफिल्ड शील्ड स्पर्धेत साऊथ ऑस्ट्रेलिया संघाकडून खेळताना दिसणार आहे. जोश हेजलवुडच्या जागी भारताविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात खेळलेल्या सीन बॉटलादेखील 'शेफिल्ड शील्ड'मध्ये न्यू साऊथ वेल्सकडून व्हिक्टोरियाविरुद्ध खेळण्यासाठी मुक्त करण्यात आले आहे. त्याला अॅशेस मालिकेसाठी जखमी कर्णधार पॅट कमिन्सचा पर्यायी खेळाडू म्हणून पाहिले जात आहे. याशिवाय लेग-स्पिनर तनवीर संघाला सिडनीमध्ये क्वीन्सलँडविरुद्ध होणाऱ्या वनडे कप स्पर्धेत न्यू साऊथ वेल्सकडून खेळण्यासाठी ऑस्ट्रेलियन टी-२० संघातून मुक्त करण्यात आले आहे. दुसऱ्यांदा पिता बनणाऱ्या अॅडम झाम्पा याचा पर्यायी खेळाडू म्हणून त्याची भारताविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी निवड झाली होती.

## विश्वविजयी जल्लोषात माजी दिग्गज खेळाडूही सहभागी

### ■ सोशल मीडियावरही व्यक्त केल्या भावना

**मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईच्या डीवाय पाटील स्टेडियममध्ये भारतीय महिला क्रिकेट संघाने इतिहास घडवला. अनेक दशकांच्या प्रतीक्षेनंतर टीम इंडियाने अखेर वर्ल्ड कपचे स्वप्न पूर्ण केले. या विजयानंतर मैदानावर आनंदाचा महापूर आला आणि या जल्लोषात माजी दिग्गजही सहभागी झाल्या.

ट्रॉफी स्वीकारल्यानंतर कर्णधार हरमनप्रीत कौरने सर्व सहकाऱ्यांसोबत मैदानावर जल्लोष साजरा केला. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये हरमनप्रीत आणि इतर खेळाडू माजी क्रिकेटपटू अंजुम चोप्रा, मिताली राज आणि झूलन गोस्वामी यांना वर्ल्ड कप ट्रॉफी देताना दिसतात. या भावनिक



क्षणी हरमनप्रीत म्हणाली, दीदी, हा कप तुमच्यासाठी... यादरम्यान, स्मृती मंधानाही भावूक झाली होती.

भारताची माजी वेगवान गोलंदाज झूलन गोस्वामीने या ऐतिहासिक विजयानंतर सोशल मीडिया एक्सवर लिहिले, हे माझे स्वप्न होते आणि तुम्ही ते पूर्ण केले. शेफाली वर्माच्या ७० धावा आणि दोन महत्त्वाचे बळी, दीप्ती शर्माचे अर्धशतक आणि पाच विकेट्स, अप्रतिम कामगिरी! ट्रॉफी आता आपल्या हाती आहे.

भारतीय महिला संघाची माजी कर्णधार मिताली राजने एक्सवर भावनिक पोस्ट शेअर करत म्हटले, दोन दशकांहून अधिक काळ मी हे स्वप्न पाहत होते. आज अखेर ते स्वप्न साकार झाले. २००५च्या वेदनेपासून २०१७च्या संघर्षापर्यंत, प्रत्येक अश्रू, प्रत्येक त्याग आणि प्रत्येक तरुणीचा आत्मविश्वास या क्षणापर्यंत घेऊन आला. तुम्ही फक्त ट्रॉफी नाही जिंकली, तर भारतीय महिला क्रिकेटसाठी धडधडणाऱ्या प्रत्येक हृदयाला जिंकलंत. जय हिंद!

भारताची माजी खेळाडू अंजुम चोप्रा म्हणाली, या मुलींनी आमची स्वप्ने साकार केली आहेत. भारतीय महिला क्रिकेट एका नव्या आणि शानदार युगात प्रवेश करत आहे.

# शांत, संयमी अमोल मुजुमदार पडद्यामागचा हिरो

**मुंबई : प्रतिनिधी**

घरच्या मैदानावर झालेल्या महिला विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला संघाने जबरदस्त कामगिरी करत पहिल्यांदाच विजेतेपदावर आपले नाव कोरून इतिहास घडवला आहे. या ऐतिहासिक यशात मोलाचा वाटा आहे तो संघाचे प्रशिक्षक असलेल्या माजी क्रिकेटपटू अमोल मुजुमदार यांचा.

मुंबईचा उत्कृष्ट फलंदाज असलेल्या अमोल मुजुमदार यांना भारतीय संघातून खेळण्याची संधी कधी मिळाली नाही, मात्र आता प्रशिक्षक म्हणून भूमिका बजावताना त्यांनी महिला संघाला विश्वविजेतेपद मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. शांत स्वभाव, संयमी नेतृत्वशैली आणि खेळाडूंमध्ये विश्वास निर्माण करत मुजुमदार यांनी संघाला हे यश मिळवून दिले. ऑक्टोबर २०२३मध्ये भारतीय



महिला संघाच्या प्रशिक्षकपदाची जबाबदारी मुजुमदार यांनी स्वीकारली होती. तेव्हापासून त्यांनी भारतीय संघामध्ये स्थैर्य आणले तसेच संघाची निवड आणि नेतृत्वाबाबत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांना आपल्या कामाच्या माध्यमातून उत्तर दिले.

मुजुमदार यांना भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्याची संधी मिळाली नव्हती, त्यामुळे जेव्हा त्यांची भारतीय महिला संघाचे प्रशिक्षक म्हणून निवड झाली होती. तेव्हा काही प्रश्न उपस्थित केले गेले होते, मात्र मुजुमदार यांनी या सर्व प्रश्नांना आपल्या कामाच्या माध्यमातून उत्तर दिले तसेच अनुभव हा केवळ आंततरराष्ट्रीय क्रिकेट खेळल्यानेच येतो असे नाही हे दाखवून दिले.

अमोल मुजुमदार यांची प्रशिक्षण देण्याची पद्धत ही पारंपरिक प्रशिक्षकांपेक्षा जरा वेगळी आहे. ते मोठमोठी भाषणे किंवा भावनिक गोष्टींवर भर देत नाहीत. तर खेळाडूंना शांत राहून आपले सर्वश्रेष्ठ प्रदर्शन करण्यासाठी प्रेरित करतात. या वर्ल्डकपमध्येही साखळी फेरीत ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडकडून पराभव झाल्यानंतर संघावर दबाव असतानाही मुजुमदार यांनी ड्रेसिंग रूममध्ये शांतता कायम राखली तसेच त्यांच्या या रणनीतीचा उत्तम परिणाम स्पर्धेच्या उत्तरार्धात दिसून आला.

### तगड्या अनुभवाचा संघाला फायदा

*अमोल मुजुमदार हे आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळले नसले तरी त्यांच्याकडे देशांतर्गत आणि प्रथमश्रेणी क्रिकेटचा तगडा अनुभव आहे. त्यांनी १७१ प्रथमश्रेणी सामन्यांत ११ हजारांहून अधिक धावा काढल्या आहेत तसेच त्यात ३०हून अधिक शतके आणि ६० अर्धशतकांचा समावेश आहे. ११३ लिस्ट ए एकदिवसीय सामन्यात त्यांनी तीन हजारांहून अधिक धावा काढल्या आहेत. त्यात तीन शतके आणि २६ अर्धशतकांचा समावेश आहे. याबरोबरच मुजुमदार यांनी १४ टी-२० सामन्यात १७४ धावा काढल्या आहेत. त्यांच्या याच तगड्या अनुभवाचा भारतीय महिला संघाला मोठा फायदा झाला.*

## राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेची गटवारी जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

परभणी विरुद्ध बीड, पिंपरी-चिंचवड विरुद्ध रायगड, रत्नागिरी विरुद्ध मुंबई उपनगर पूर्व या किशोर गटाच्या; तर नाशिक शहर विरुद्ध ठाणे ग्रामीण, पिंपरी-चिंचवड विरुद्ध नांदेड, परभणी विरुद्ध जळगाव या किशोरी गटाच्या सामन्यानी ३६व्या किशोर व किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला ५ नोव्हेंबरपासून प्रारंभ होईल.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमान पदाखाली राकेशभाऊ घुले कबड्डी संघ यांच्या विद्यमाने पाच दिवस ही स्पर्धा खेळली जाणार आहे. या स्पर्धेची गटवारी राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबूराव चांदेरे यांनी जाहीर केली.

गतवर्षी नाशिकच्या मनमाड येथे झालेल्या या स्पर्धेत परभणीने किशोर, तर यजमान नाशिक शहरने किशोरी गटात विजेतेपद पटकाविले होते. पिंपरी-चिंचवड संघाला दोन्ही गटात उपविजेत्यापदावर समाधान मानावे लागले होते. यंदा सामने पुण्यातच असल्याने होत असल्याने पिंपरी-चिंचवड संघ या संधीचा कसा लाभ उठवितो हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com